नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २१२ * * अमरावती * बुधवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

दरीत कोसळली बस, ४ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, डेहराडून, दि. ३ :

डेहराडूनमध्ये हिमाचल प्रदेशची एचआरटीसी बस दरीत कोसळली, यात ४ प्रवाशांचा मृत्यू झाला. तर ३५ हून अधिक लोक जखमी झाले असून, त्यापैकी ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. मृतांमध्ये दोन महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे.

हा अपघात त्यूणी परिसरात झाला. सकाळी सुमारे १० वाजता हिमाचल प्रदेशातील नेरवा-चौपाल येथून पांवटा साहिबकडे जाणारी एचआरटीसी बस हरिपूर-क्वानू मीनस मार्गावर क्वानूजवळ अनियंत्रित होऊन खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि बचाव पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि मदत व बचाव कार्य सुरू केले.

पाकडे, वाकडे ते वाकडेच

आग्रह लेख खरीखरी.. श्रीकृष्ण चांडक

पाकिस्तानचा जन्म भारताच्या विभाजनातून झाला. ब्रिटिशांनी पाकिस्तानच्या दोन्ही भागात दोन पाकिस्तान निर्मिले. पैकी पूर्व भागातील पाकिस्तान आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी दंड थोपटून उभा राहिला. १९७१ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पूर्व पाकिस्तानला बांगलादेश बनवले. इकडील पाकिस्तानच्या अन्यायाविरुद्ध तिकडचा बांगलादेश सदैव उभा होत होता. गेल्या वर्षी भारताचा मित्र असणारा बांगलादेश आता पाकिस्तान सारखाच भारताचा वैरी झाला आहे. मागील महिन्यात बांगला देशाच्या एका खेळाडू विरुद्ध भारतात कारवाई झाल्यावर बांगलादेशच्या सरकारने भारतातील क्रिकेटचे सामने न खेळण्याचा निर्णय घेतला. टी-ट्वेंटी मध्ये आपण खेळणारच नाही असे त्यांनी जाहीर केल्यामुळे आयसीसी या आंतरराष्ट्रीय संघटनेने बांगला देशला बाद केले म्हणजे आता या टी-ट्वेंटी विश्वचषकात बांगलादेश राहणार नाही. त्याऐवजी स्कॉटलंडच्या संघाला प्रवेश देण्यात आला आहे, आधीच इन मीन पंचवीस ते तीस देशांमध्ये खेळला जाणारा क्रिकेटचा हा खेळ अजूनही ऑलिंपिक साठी पात्रतेचा मानला जात नाही. अशा या खेळात सध्यातरी भारताचा दबदबा आहे. भारतात क्रिकेट खेळवणारी संघटनाही मोठ्या प्रमाणावर अब्जावधी रुपये कमावते, आपल्या खेळाडूंवर खर्चही करते. खेळाडूंना भरघोस मुद्रा मिळते त्यामुळे खेळाडूही प्रसन्न असतात. आता बांगलादेशच्या पावलावर पाऊल टाकून पाकड्यांनीही भारताबरोबर खेळणार नाही असा निर्णय जाहीर केलेला आहे. पाकिस्तान खेळो अथवा न खेळो, त्यामुळे भारतावर कोणताही परिणाम होणार नाही. उद्या समजा प्राथमिक सामन्यात भारताबरोबर पाकिस्तान खेळला नाही आणि कर्मधर्म संयोगाने शेवटच्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान यांचा सामना झाला आणि त्यावेळी पाकिस्तानने वाकडेपणा करून बहिष्कार घातला. तर न खेळताच विश्वचषक भारताकडे येईल, एवढी साधी अक्कलही पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाला नसेल असे आम्हाला तरी वाटत नाही. आयसीसी ने बांगला देशला बाहेरचा रस्ता दाखवल्यावर त्याला समर्थन देणारे पाकिस्तानचे क्रिकेट बोर्ड पाकिस्तान सरकारच्या आदेशाची वाट बघत होते. पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी हे पाकिस्तानच्या सरकारात मंत्री आहेत. मग बहिष्कार टाकल्यामुळे पाकिस्तानच्या क्रिकेटचे आणि खेळाडूंचे सर्व दृष्टीने प्रचंड नुकसान होणार आहे. एवढी साधी अक्कल नक्वीकडे असती तर त्याने असा निर्णय घेतला नसता हे नक्की. हे नक्वी महाशय आशिया क्रिकेट समितीचे अध्यक्ष होते. भारताने त्या वेळी आशिया चषक जिंकल्यामुळे तो चषक भारताकडे येणे क्रमप्राप्त होते परंतु भारतीय संघाने थोडासा शहाणपणा करून नकवी यांच्या सोबत हस्तांदोलन केले नव्हते. मग नकवीने काय करावे, चक्क त्या पाकडी वाकड्याने तो चषकच घेऊन तिथून पलायन केले. म्हणजे थोडासा वात्रटपणा आपल्या संघाने केला हे मान्य करूनही चषकच पळवून नेणे हे कार्य केवळ पाकडेच करू शकतात असे दिसून आलेले आहे. भारत आणि पाकिस्तान यांचे सामने होणे म्हणजे प्रेक्षकांचे त्यावर तुटून पडणे असते. सर्वाधिक तिकिटे विकली जातात ती या दोन देशांच्या क्रिकेट मधील संघर्षाचा सामना पाहण्यासाठी. आताच्या विश्वचषक सामन्यात पाकिस्तान भारताबरोबर खेळणार नाही म्हणजे भारताला आपोआपच विजय मिळेल पण आपल्या भूमिकेमुळे अंतिम सामन्यात विजय मिळू शकतो. ही साधी अक्कल या वाकड्या पाकड्यांना नाही असेच दिसून येत आहे. पाकिस्तान क्रिकेटचे प्रमुख नक्वी हे मुळातच वाकडे आहेत हे त्यांनी दाखवून दिलेलेच आहे. हे पाकिस्तानचे वाकडेपण लढाईच्या रणापासून क्रिकेटच्या मैदानापर्यंत नेहमीच दिसून आले आहे. भारताकडून अनेक वेळा सपाटून मार खाल्ल्यावरही त्यांचे वाकडेपण दिवसेंदिवस वाढतच आहे असे दिसून येते. हा वाकडेपणा पाकिस्तानला जगासमोर हास्यास्पद अवतारात प्रकट करत असतो. क्रिकेट सारख्या खेळात जे पाच पंचवीस संघ खेळतात, त्यामध्ये भारतानेही पोक्तपणा दाखवून बहिष्कार बिहिष्कार न करता पाकड्यांना किंवा बांगला देशियांना आस्मान दाखवणे हेच उचित ठरेल. बहिष्कार वगैरे महामूर्खपणा आहे हे आता त्यांना बजावून सांगितले पाहिजे. पाकिस्तानचे वाकडे आणि आता बांगलादेशचे वाकडे यांची जोडी पुढे कोणता विनोदी कार्यक्रम दाखवील, याची वाट बघणेच आपल्या हाती आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

लोकसभेत सलग दुसऱ्या दिवशी गदारोळ

९ खासदार निलंबित

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :

लोकसभेत राहुल गांधींच्या भाषणामुळे सलग दुसऱ्या दिवशी गोंधळ उडाला. मंगळवारी दुपारी २ वाजता राहुल गांधींनी माजी लष्करप्रमुखांच्या अप्रकाशित पुस्तकातील एक लेख सभागृहात सादर केला. ते म्हणाले, मला बोलू द्या.

त्यांनी हे बोलताच, एनडीए खासदारांनी त्यांना अडवण्यास सुरुवात केली. त्यांनी १४ मिनिटे बोलण्याचा प्रयत्न केला. राहुल म्हणाले, मला परवानगी दिली जात नाहीये. मला बोलू दिले जात नाहीये. मी विरोधी पक्षनेता आहे. मी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी फक्त तुम्हाला चीन आणि भारत यांच्यात काय घडले ते सांगत आहे. पूर्व लडाखमध्ये आपले सैनिक शहीद झाले. यानंतर, कामकाज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

इकडे, अमेरिकेशी झालेल्या व्यापार करारावर मंगळवारी सकाळी एनडीएच्या संसदीय दलाच्या बैठकीत पंतप्रधान मोदींचे स्वागत करण्यात आले. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, हे अद्भुत आणि ऐतिहासिक आहे.

तर, विरोधक अमेरिका-भारत व्यापार करारावर पंतप्रधानांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. काँग्रेसने म्हटले, शस्त्रसंधी (ऑपरेशन सिंदूर) प्रमाणेच व्यापार कराराची घोषणा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केली. पंतप्रधान मोदींनी हार मानली आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले आणि ते फक्त ८ मिनिटे चालले. विरोधकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. सभागृह दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

दुसऱ्यांदा सभागृहाचे कामकाज फक्त १३ मिनिटे चालले. अध्यक्षांनी सभागृह दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केले. लोकसभा अध्यक्षांनी विरोधी खासदारांना सांगितले की घोषणाबाजी चुकीची आणि नियमांविरुद्ध आहे. तरीही, विरोधकांनी गदारोळ सुरूच ठेवला. सभागृहाचे कामकाज कोणत्याही व्यत्ययाशिवाय चालावे यासाठी अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काँग्रेस आणि भाजप खासदारांसोबत गदारोळाबाबत बैठक घेतली आहे. दरम्यान, सभागृहाबाहेर विरोधी खासदारांनी अमेरिका-भारत व्यापार करारावरून घोषणाबाजी केली.

राहुल गांधी यांच्या भाषणादरम्यान गोंधळ झाला. अनेक विरोधी खासदार सभागृहाच्या वेलीमध्ये घुसले, काहींनी सभापतींवर कागदपत्रे फेकली. नंतर सभापतींनी अमरिंदर सिंग राजा वडिंग, प्रशांत पडोळे, एस. वेंकटरमण, माणिकम टागोर, किरण कुमार रेड्डी, हिबी एडन, गुरजीत औजला, श्याम बर्वे यांना निलंबित केले .

मी अध्यक्ष होणार नाही!

विलीनीकरणाचा प्रस्ताव नाही : प्रफुल्ल पटेल यांची स्पष्टोक्ती

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर आपण पक्षाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर कोण? काय? कसे? कुठे हे पाहण्याची जबाबदारी माझी आहे. त्यामुळे मी स्वतः राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष होणार नाही हे स्पष्ट आहे, असे ते म्हणालेत. आज आमच्यापुढे विलीनीकरणाचा कोणताही प्रश्न नसल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले. त्यामुळे अजित पवारांच्या पश्चात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत सुरू असणारी विलीनीकरणाची कथित चर्चा पुढे सरकणार नसल्याचे हे आता स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या केंद्रीय कार्यालयात आज अजित पवारांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना प्रफुल्ल पटेल म्हणाले, आम्ही आमच्या पक्षाचे सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे आदी नेत्यांशी संवाद साधून सुनेत्रा पवार यांच्या घरी गेलो. त्यांची पार्थ व जय पवार ही दोन्ही मुले तिथे होती. आम्ही त्यांचे सांत्वन करत राष्ट्रवादी काँग्रेस खंबीरपणे तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या पाठिशी आहे. ही आमची व जनतेचीही भावना आहे की, आपण ही जबाबदारी स्वीकारावी. त्यावर सुनेत्रा पवारांनी आमच्या विनंतीला मान दिला.

आमच्या अंतर्गत प्रश्नांवर सध्या उलटसुलट चर्चा सुरू आहेत. आम्ही आमच्या पक्षाचे नेते निवडणार की, दुसरा एखादा व्यक्ती निवडणार? आम्ही एक पक्ष आहोत. त्याचे दोन पार्ट आहेत. पहिला पार्ट आहे विधीमंडळ व दुसरा पार्ट आहे राजकीय पक्ष. विधीमंडळाचा पार्ट संपला. आता अनेक लोकांची विधाने येत आहेत, असे ते म्हणाले.

प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी अजित पवारांच्या निधनानंतर पक्षाची सर्व प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्याची जबाबदारी आपल्यावर असल्याचेही स्पष्ट केले. ते म्हणाले, एका केंद्रीय मंत्र्याने चुकून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून माज्या नावाचा उल्लेख केला. मी पक्षाचा कार्याध्यक्ष आहे. त्यामुळे विधीमंडळ किंवा राष्ट्रीय अध्यक्षाचा विषय मार्गी लावण्याची जबाबदारी व प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी माज्यावर आहे. महाराष्ट्रात ही जबाबदारी सुनील तटकरे यांच्यावर असल्याचे ते म्हणाले.

पीएम मोदी, शहांची भेट

प्रफुल्ल पटेल यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. पटेल यांनी या दोन्ही नेत्यांशी स्वतंत्रपणे बंद दरवाज्याआड चर्चा केली. अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाचा पेचप्रसंग तथा विलीनीकरणाच्या मुद्यावर उलटसुलट चर्चा सुरू असताना प्रफुल्ल पटेल यांनी मोदी व शहांची भेट घेतली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाला मोदी - शहांनी ग्रीन सिग्नल दिल्याची नवी माहिती पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रफुल्ल पटेल यांनी या दोन्ही नेत्यांची भेट घेतली आहे. त्यामुळे साहजिकच त्यांनी या बैठकीत या दोन्ही नेत्यांनी विलीनीकरणाच्या त्यांनी हिरवी झेंडी दिली होती काय? याची खातरजमा केल्याचेही सांगण्यात येत आहे. पण त्याची पुष्टी होऊ शकली नाही.

व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीचे

विशेष ऑडिट होणार

अजित पवार विमान दुर्घटना

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातातील मृत्यूनंतर आता या दुर्घटनेच्या चौकशीने वेग घेतला आहे.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत, अजित पवार ज्या कंपनीच्या विमानाने प्रवास करत होते, त्या 'व्हीएसआर व्हेंचर्स' कंपनीच्या विशेष ऑडिटचे आदेश दिले आहेत. या ऑडिटमध्ये कंपनीच्या सुरक्षेचे नियम आणि विमानांच्या देखभालीबाबतचे गंभीर प्रश्न समोर येण्याची शक्यता आहे.

अजित पवार प्रवास करत असलेल्या 'लिअरजेट ४५ एक्सआर' या विमानाच्या अपघाताची सखोल चौकशी करण्यासाठी डीजीसीएने विशेष पथक नियुक्त केले आहे.

या ऑडिटचा सविस्तर अहवाल १५ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. कंपनीचे दैनंदिन कामकाज, वैमानिकांचे लॉगबुक्स आणि विमानांच्या देखभालीचे रेकॉर्ड्स तपासले जातील. कंपनीकडून विमानांची वेळोवेळी तांत्रिक तपासणी केली जात होती का? यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

सुनेत्रा पवार यांचे राजकीय स्थान बळकट
पुणे व बीड जिल्ह्यांच्या पालकमंत्री

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात झालेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

राज्य सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, सुनेत्रा पवार या पुणे आणि बीड जिल्ह्यांच्या पालकमंत्री म्हणून काम पाहणार आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांच्याकडे पुणे व बीड या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे.

पुणे जिल्हा हा राज्यातील सर्वात मोठ्या आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी जिल्ह्यांपैकी एक मानला जातो, तर बीड जिल्हा मराठवाड्यातील महत्त्वाचा जिल्हा आहे. या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आल्याने त्यांच्या भूमिकेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

अजित पवार यांच्या कार्यशैलीचा वारसा पुढे नेत, जिल्हास्तरावरील विकासकामांना गती देण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त केली जात आहे. सरकारच्या या निर्णयामुळे सुनेत्रा पवार यांचे राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय स्थान बळकट झाल्याचे मानले जात आहे.

दुसरीकडे, पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. सुनेत्रा पवार यांची राज्यसभेची मुदत ४ जुलै २०२८ पर्यंत शिल्लक असली तरी, त्या जागेऐवजी सहा वर्षांच्या पूर्ण कार्यकाळाच्या दुसऱ्या जागेवर पार्थ पवार यांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भारतावरील टॅरिफ १८% टक्के

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :

भारत आणि अमेरिकेदरम्यान ज्या व्यापार कराराची दीर्घकाळापासून प्रतीक्षा होती, त्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. ट्रम्प म्हणाले की, अमेरिकेने भारतावरील रेसिप्रोकल टॅरिफ (परस्पर कर) १८% पर्यंत कमी केले आहे.

ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यानंतर रात्री ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्यापार कराराची घोषणा केली. ट्रम्प यांनी दावा केला की, मोदी रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवून अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करण्यास सहमत झाले आहेत. ट्रम्प यांच्या मते, भारत बाय अमेरिकन धोरणांतर्गत अमेरिकेकडून ४६ लाख कोटी रुपये पेक्षा जास्त किमतीचा माल खरेदी करेल.

निवडणूक : शिक्षकांना सूट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सी-टीईटी) देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या कर्तव्यातून सूट देण्यात आली असून तसे निर्देश सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यामुळे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेची तयारी करणाऱ्या शिक्षकांना दिलासा मिळाले आहे.

१२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीच्या मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला आहे . त्यानुसार ५ फेब्रुवारी ऐवजी आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्याच वेळी राज्यातील काही शिक्षकांची सी-टीईटी परीक्षा असल्यामुळे संबंधित शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट देऊन पर्यायी व्यवस्था करण्याबाबत आयोगाकडून निर्देश देण्यात आले आहेत.

महापौर पदाच्या निवडणुकीत पत्ते उघडू...

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३ :

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत ५७ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमतासाठी एका जागेची कमतरता असल्याने सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे.

तर दुसरीकडे ३३ जागा जिंकून एमआयएमने दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष म्हणून मुसंडी मारली आहे. या पार्श्वभूमीवर, भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी इतर सर्व पक्ष एकत्र येणार का आणि एमआयएम नेमकी काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

१० तारखेला महापौर निवडणुकीबाबत राजकारणात काहीही होऊ शकते, असे सूचक विधान करत इम्तियाज जलील यांनी सस्पेन्स अधिकच वाढवला आहे. तसेच १० तारखेला पत्ते उघडू, असेही त्यांनी म्हटले आहे.

महापौर निवडीत महायुतीचे वर्चस्व

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :

राज्यात महापौर आणि उपमहापौर निवडीच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. ठाणे, पुणे आणि कल्याण-डोंबिवलीत महायुतीचे वर्चस्व दिसून आले.

या शहरांमध्ये भाजपने आपल्या मित्रपक्षांसोबत सत्ता स्थापन केली असून, अनेक ठिकाणी या निवडी बिनविरोध झाल्या आहेत. मीरा-भाईंदर महानगरपालिकेत भाजपने डिंपल मेहता यांना महापौरपदी बसवले आहे. पुणे महापौरपदासाठी भाजपच्या नगरसेविका मंजूषा नागपुरे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे अर्थव्यवस्था अस्थिर होण्याचा धोका

१६ व्या वित्त आयोगाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

रोख पैशांच्या स्वरूपात लाभ देण्याच्या योजनांवरील वाढत्या अवलंबित्वामुळे राज्यांची अर्थव्यवस्था अस्थिर होण्याचा धोका आहे, असा इशारा १६ व्या वित्त आयोगाने संसदेत सादर केलेल्या आपल्या अहवालात दिला आहे. या इशाऱ्यामुळे राज्य सरकार लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात एखादा ठोस निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. राज्यातील लाखो महिलांना सध्या डीबीटीद्वारे हा लाभ दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर १६ व्या वित्त आयोगाने महाराष्ट्र, ओडिशा व झारखंड या राज्यांचा दाखला देत उपरोक्त इशारा दिला आहे.

अरविंद पनगडिया यांच्या नेतृत्वातील वित्त आयोगाने संसदेत सादर केलेल्या २०२६-३१ च्या आपल्या पंचवार्षिक अहवालात म्हटले आहे की, अशा योजनांमुळे राज्यांच्या अनुदान खर्चाच्या पद्धतीत मोठा बदल झाला. २१ राज्यांमध्ये रोख हस्तांतरण योजनांद्वारे पैशांच्या वापरावरील अटींशिवाय लाभार्थ्यांना थेट पैसे दिले जातात.

महाराष्ट्राचा रोख हस्तांतरण योजनांवरील खर्च २०२३-२४ मधील एकूण महसुली खर्चाच्या ०.६ टक्क्यांवरून २०२५-२६ मध्ये ६.२ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. प्रमुख राज्यांनी महसुली खर्च अशा योजनांसाठी सुरू ठेवला, तर त्यामुळे राज्यांच्या अर्थसंकल्पावर केवळ मोठा भारच पडणार नाही, तर दीर्घकाळात त्यांची आर्थिक स्थितीही अस्थिर होईल, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

भवभूति शिक्षण संस्था आमगांव, जि. गोंदिया

विनम्र अभिवादन

श्रध्देय लक्ष्मणराव मानकर गुरुजी
जयंती समारोह २०२६

अध्यक्ष: मा. सुधीर दिवे (माजी, महासचिव प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था (मानकर ट्रस्ट))
उद्घाटक: मा. डॉ. संतोष चव्हाण, सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग नागपूर
प्रमुख अतिथी: मा. लायकराम भेंडारकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद गोंदिया
विशेष अतिथी: मा. विजय रहांगडाले, आमदार, तिरोडा-गोरेगांव विधानसभा क्षेत्र
विशेष अतिथी: मा. इंजी. राजकुमार बडोले, आमदार, मोर/अर्जुनी विधानसभा क्षेत्र
विशेष अतिथी: मा. विनोद अग्रवाल, आमदार, गोंदिया विधानसभा क्षेत्र
विशेष अतिथी: मा. संजय पुराम, आमदार, आमगांव-देवरी विधानसभा क्षेत्र

बुधवार ४ फेब्रुवारी दुपारी १२.०० वा.
स्थळ : आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आमगांव
सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत..

माजी आमदार केशवराव मानकर
सचिव

संचालक मंडळ

सुरेशबाबू असाटी, अध्यक्ष
प्रमोद कटकवार, उपाध्यक्ष
रमेश कावळे, सदस्य
हरिहर मानकर, सदस्य
ललीत मानकर, सदस्य
सौ. उर्मिलाबाई कावळे, सदस्य
सौ. लक्ष्मीबाई नागपुरे, सदस्य
सौ. सेहा मानकर, सदस्य
दिनेश राऊत, समारोह संयोजक

९ तारखेनंतर खुलासा

रोहित पवार यांचे विधान

■ **मुंबई :** अजितदादांची बातमी आपण ऐकली, बातमी खरी आहे का स्वप्न आहे तेच कळत नाही. हा काळ शोक आणि आत्मचिंतनाचा आहे. त्यामुळे १३ दिवस राजकारणावर कोणतेही भाष्य करणार नाही. अजितदादांचं तेरावं होईपर्यंत म्हणजे ९ तारखेपर्यंत मी कुठलीही राजकीय चर्चा करणार नाही. अजितदादांच्या तेराव्याचा कार्यक्रम झाल्यानंतर मी राजकीय विषयावर भाष्य करेन. सर्व प्रश्नांना सविस्तर आणि स्पष्ट उत्तरे दिली जातील, असे रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

९ तारखेला पत्रकार परिषद घेऊन दादांबरोबर नेमकी काय चर्चा झाली, संपूर्ण प्रक्रियेत काय घडले याबाबतचे सर्व तपशील दिले जातील, असं रोहित पवारांनी सांगितले. सगळ्या प्रक्रियेत मी होतो. मात्र, तेरा दिवसांनी याबाबतचे सर्व तपशील मांडले जातील. दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीला पवार कुटुंब अनुपस्थित होते. त्यासंदर्भात रोहित पवार म्हणाले की, शपथविधी होणार आहे याची आम्हाला पूर्वकल्पना नव्हती. त्यासंदर्भात टीव्हीवरूनच बातम्यांच्या माध्यमातून समजले.

कात्रज दूध संघाला आता अजितदादा पवारांचे नाव

■ **पुणे :** पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित (कात्रज) या संस्थेचे नाव बदलून ते अजितदादा पवार पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, कात्रज असे करण्याचा ठराव नुकताच संचालक मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्याच्या सहकार आणि दूध उत्पादक क्षेत्रात अजित पवार यांचे असलेले योगदान लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात येत आहे.

कात्रज दूध संघ हा जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारी महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेच्या उभारणीत आणि विस्तारात अजित पवार यांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या निधनानंतर, त्यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि त्यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी संचालक मंडळाने नामकरणाचा हा प्रस्ताव मांडला होता, ज्याला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

हा ठराव आता पुढील कायदेशीर मान्यतेसाठी सहकार विभागाच्या निबंधकांकडे पाठवला जाईल. सरकारची अधिकृत मंजुरी मिळाल्यानंतर संस्थेच्या नावाचा बदल अंमलात येईल. या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात अजितदादांच्या कार्याला उजाळा दिला जात आहे.

अमराठी बिल्डरची मराठी तरुणाला मारहाण

■ **मुंबई :** सुशील रहेजा नामक एका मुंबईतील बांधकाम व्यावसायिकाने मराठी तरुणाला मारहाण व शिवीगाळ केल्याची घटना समोर आली आहे. मनसेने या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त करत आपल्या पद्धतीने न्याय करण्याचा इशारा दिला आहे. केंद्र राज्य व आता मुंबईतही भाजपची सत्ता आल्यामुळे रहेजा नामक बेडकांची डराव - डराव वाढली आहे, असे मनसेने म्हटले आहे.

भाजपने मुंबई लगतच्या मीरा-भाईंदर महापालिकेच्या महापौरपदी एका अमराठी व्यक्तीची निवड केली आहे. मराठी एकीकरण समितीने या प्रकरणी रान पेटवले आहे. हा वाद टोकाला भिडला असतानाच आता मुंबईतील एका अमराठी बिल्डरने मराठी तरुणाला 'तुम घाटी के लोग कशी सुधरोगे नहीं' असे म्हणत मारहाण केल्याची घटना उजेडात आली आहे. यामुळे एकच खळबळ माजली आहे. मनसेचे नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी सत्ताधारी भाजपवर शरसंधान साधत निर्वाणीचा इशारा दिला आहे.

मुंबई मनपावर ११ ला बसणार भाजपचा महापौर

सत्तासूत्र ठरले

उपमहापौर शिंदेसेनेचा होणार

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. ३ :

सुमारे ७४ हजार कोटी रुपयांचे वार्षिक बजेट असलेल्या देशातील सर्वात श्रीमंत मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाचा सस्पेन्स आता संपला आहे.

येत्या ११ फेब्रुवारी रोजी महापौरपदाची निवडणूक होणार असून राजकीय वर्तुळांतील चर्चेनुसार मुंबईचा आगामी महापौर भाजपचा असेल, तर उपमहापौरपद शिंदेसेनेच्या पदरात पडणार आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असल्याने किमान एक टर्म शिंदेसेनेला महापौरपद मिळावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लावून धरली आहे. मात्र, बदललेल्या राजकीय समीकरणात भाजप आपला दावा सोडण्यास तयार नसल्याचे दिसते.

भाजपकडून गणेश खणकर यांची गटनेतेपदी नियुक्ती

निवडणुकीचा निकाल १६ जानेवारीला लागूनही महायुतीने गटनेत्याची घोषणा लांबणीवर टाकली होती. अखेर १७ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर सोमवारी भाजपने गणेश खणकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

खणकर यांनी प्रभाग ७ मधून उद्धवसेनेचे माजी आमदार विनोद घोसाळकर यांचे पुत्र सौरभ घोसाळकर यांचा पराभव केला आहे. टँकर माफियांविरोधात आवाज उठवल्यामुळे खणकर चर्चेत आले होते, ज्या वेळी त्यांच्यावर जीवघेणा हल्लाही झाला होता.

प्रशासकीय नाड्या मात्र उद्धव ठाकरेंच्या हाती राहण्याची चिन्हे

महायुतीचा महापौर बसणार असला तरी प्रशासकीय नाड्या मात्र उद्धव ठाकरेंच्या हाती राहण्याची चिन्हे आहेत. १८ पैकी ८ प्रभाग समित्यांवर ठाकरे गटाचे वर्चस्व असल्याने अर्ध्या मुंबईच्या विकासकामांचे भवितव्य मातोश्रीवरून ठरेल. रस्ते, पाणी आणि कचऱ्याचे स्थानिक प्रश्न सोडवताना भाजपच्या महापौराला पावलोपावली ठाकरेंच्या प्रभाग अध्यक्षांशी संघर्ष करावा लागणार आहे.

अजित पवार गटाच्या ३ नगरसेवकांनी शिंदेसेनेला पाठिंबा दिल्याने २६ सदस्यीय स्थायी समितीत महायुतीचे संख्याबळ १४ वर पोहोचले आहे. उद्धवसेना आणि काँग्रेसकडे १२ सदस्य आहेत. अजित पवार गटाला पाठिंब्याच्या बदल्यात एक स्वीकृत नगरसेवकपद दिले जाणार असल्याचे कळते.

शिंदेसेनेने केली गट नोंदणी

महापौरपदासाठी भाजपच्या या ५ रणरागिणींची नावे भाजपमध्ये महापौरपदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. या शर्यतीत पक्षातील पाच प्रभावी महिला नगरसेविकांची नावे अग्रक्रमाने चर्चेत आहेत. सायनमधील आक्रमक चेहरा आणि प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असलेल्या राजश्री शिरवडकर यांचे नाव सध्या आघाडीवर मानले जात आहे.

दुसरीकडे, माहीमच्या बालेकिल्ल्यात उद्धवसेनाला थेट धडक देणाऱ्या शीतल गंभीर-देसाई आणि घाटकोपरमध्ये दांडगा जनसंपर्क असलेल्या रितू तावडे यांच्या नावाचाही पक्ष गांभीर्याने विचार करत आहे.

ज्येष्ठतेचा विचार केल्यास माजी उपमहापौर अलका केरकर यांना संघ परिवारातून मोठे पाठबळ मिळण्याची शक्यता आहे. तर मुंबईच्या भूमिपुत्रांना साद घालण्यासाठी आणि सोशल इंजिनिअरिंगचा भाग म्हणून मालाडच्या योगिता कोळी यांच्या रूपाने भाजप ओबीसी कार्ड खेळू शकतो, असेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

लाडकी बहीण योजनेला अजित पवारांचे नाव द्या

मिटकरींची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. ३ :

राज्य सरकारची महत्वाकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी या योजनेला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याची मागणी करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.

अजित पवार यांच्या दूरदृष्टीतून आकाराला आलेल्या या योजनेला अजितदादांची लाडकी बहीण योजना, असे नामकरण करून त्यांच्या स्मृती जपाव्यात, अशी विनंती त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. मिटकरींच्या या मागणीमुळे योजनेच्या नावाभोवती नवे राजकीय वारे वाहू लागले आहेत.

अमोल मिटकरी म्हणाले की, लाडक्या बहिणींसाठी सुरु केलेली ही योजना केवळ आर्थिक मदतीची नाही, तर सामाजिक सन्मानाची आहे. अजितदादांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा केला आणि या योजनेला गती दिली. त्यामुळे त्यांच्या स्मृतींना अनोख्या पद्धतीने आदरांजली द्यायची असेल, तर या योजनेला त्यांचे नाव देणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या या वक्तव्यामुळे कार्यकर्त्यांमध्येही चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय मी थांबणार नाही, असे म्हणत दरमहा 2100 रुपये देण्यात येतील, असे स्पष्ट केले. ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला आहे, या भावनिक भाषेत त्यांनी महिलांशी संवाद साधला. त्यामुळे आर्थिक लाभात वाढ होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

मराठी महापौर पदासाठी पेटली लढाई

डिंपल मेहतांच्या नावावरून वाद

मराठी एकीकरण समितीकडून आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. ३ :

मीरा - भाईंदर महानगरपालिकेतील महापौर निवडणुकीनंतर शहरातील राजकीय वातावरणाने अनपेक्षित आणि वादग्रस्त वळण घेतले आहे. मराठी महापौर, या मुद्द्यावरून आता संघर्षाची ठिणगी पडल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

भाजपकडून डिंपल मेहता या महापौर झाल्यामुळे, मीरा-भाईंदरला एमएमआरमधील पहिला अमराठी महापौर मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर मराठी समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि मराठी एकीकरण समिती आक्रमक भूमिकेत आल्याचे दिसत आहे.

या वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर मराठी एकीकरण समितीकडून आज पुन्हा एकदा मीरा-भाईंदर महापालिकेबाहेर आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी महापौरच बसावा, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार असून, शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, भाजपकडून डिंपल मेहता यांनी एकमेव अर्ज भरल्याने त्यांनी आज महापौरपदाची सूत्रे स्वीकारी. त्यामुळे आंदोलन आणि शपथविधी एकाच दिवशी होणार असल्याने परिस्थिती अधिकच संवेदनशील बनली आहे.

सुभाष चंद्र बोस मैदान ते मीरा-भाईंदर महापालिका असा मोर्चा सकाळी दहा वाजता काढला जाणार आहे. मात्र या मोचार्ला अद्याप पोलिसांची अधिकृत परवानगी मिळालेली नाही. परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रेही पोलिसांना देण्यात आलेली नसल्याने, पोलिसांनी आयोजकांना नोटीस बजावली आहे. या नोटीसमध्ये आंदोलन सुभाष चंद्र बोस मैदानातच मर्यादित ठेवावे, असे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. तरीही मोर्चा काढण्याचा निर्धार समितीने कायम ठेवला आहे.

सुप्रीम कोर्टाने रोहित पवारांना खडसावले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**

सुप्रीम कोर्टाने एमसीए अर्थात मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या सदस्य नोंदणीवर तीव्र आक्षेप नोंदवत आमदार रोहित पवार यांना खडेबोल सुनावलेत. एवढी बेकायदा कामे करण्याची हिंमत होतेच कशी? असा खडा सवाल कोर्टाने केला आहे. कोर्टाच्या या भूमिकेनंतर रोहित पवार यांनी यासंबंधीची आपली याचिका मागे घेतली आहे.

रोहित पवार यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांसह ४०० जणांची एमसीएवर आजीवन सदस्य म्हणून नोंदणी केली होती. त्यावर माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी आक्षेप घेतला होता. त्यांच्या मते, बीसीसीआयच्या निकालानंतर सदस्य नोंदणीला सुप्रीम कोर्टाची परवानगी लागते. तत्पूर्वी, एमसीएच्या घटनेतही तसा बदल करावा लागतो. पण त्यानंतरही रोहित पवार यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांसह ४०० जणांची एमसीएवर आजीवन सदस्य नोंदणी केली. यावरून कोर्टाने रोहित पवारांना खडेबोल सुनावले.

पंकजा मुंडेंच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३ :**

भाजप नेत्या व राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये आज तांत्रिक बिघाड झाल्याची घटना उघडकीस आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथून लातूरकडे उड्डाण घेण्याच्या तयारीत असताना वैमानिकाच्या सतर्कतेमुळे हा बिघाड वेळेत लक्षात आला यामुळे मोठी दुर्घटना टळली.

सध्या पंकजा मुंडे मराठवाड्यात जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचार दौऱ्यावर आहेत. आज लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी त्यांच्या प्रचारसभा नियोजित होत्या. त्यासाठी त्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून हेलिकॉप्टरने लातूरकडे रवाना होणार होत्या. मात्र हेलिकॉप्टर हवेत झेप घेण्यापूर्वीच तांत्रिक अडचण आढळून आल्याने सुरक्षेच्या कारणास्तव तात्काळ उड्डाण रद्द करण्यात आले.

या घटनेमुळे लातूरमधील त्यांच्या नियोजित सभांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. कार्यकर्त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी तातडीने दुसऱ्या हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली असून पंकजा मुंडे लवकरच लातूरकडे रवाना होतील, अशी माहिती देण्यात आली आहे. थोडा विलंब झाला असला तरी सर्व नियोजित सभांना त्या उपस्थित राहणार असल्याचे त्यांच्या कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

अजित पवारांचा ना दशक्रिया विधी, ना तेरावा

पुढे धार्मिक कार्यक्रम नाही : श्रीनिवास पवार यांचा मोठा खुलासा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर पारंपरिक धार्मिक विधींबाबत सुरू असलेल्या चर्चांना त्यांच्या बंधू श्रीनिवास पवार यांनी स्पष्ट उत्तर दिले आहे.

विमान अपघातात अजित पवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यानंतर बारामतीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. पुढील धार्मिक विधी कधी आणि कसे होणार याबाबत अनेक तर्क-वितर्क लावले जात असताना, श्रीनिवास पवार यांनी माध्यमांशी बोलताना महत्त्वाची माहिती दिली.

अंत्यसंस्कारानंतरच्या विधींमध्ये ३० जानेवारी हा दिवस निर्णायक ठरल्याचे त्यांनी सांगितले. २९ जानेवारीला विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अस्थी सावडण्याचा कार्यक्रम झाला. त्याच दिवशी सोनगाव येथे कऱ्हा-नीरा संगमावर अस्थी विसर्जन करण्यात आले. याच वेळी आवश्यक असलेले सर्व धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले, असे श्रीनिवास पवार यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पुढे दशक्रिया किंवा तेरावा अशा कोणत्याही वेगळ्या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन होणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

कुटुंबीयांनी अस्थी विसर्जनावेळीच सर्व धार्मिक कृत्ये पूर्ण केल्याने अशा विधींची आवश्यकता उरलेली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

खासगी शाळांची कोट्यवधींची नफेखोरी

शिक्षकांना पेन्शन नाही

आंतरराष्ट्रीय शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे!

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. ३ :

राज्यातील सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई यांसारख्या स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे.

'युनायटेड पेरेंट्स टीचर्स असोसिएशन'चे सचिव सचिन चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून, या शाळांमधील कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देणे शाळा व्यवस्थापनावर बंधनकारक करण्याची मागणी केली आहे.

सचिन चव्हाण यांनी पत्रात नमूद केले आहे की, या नामांकित शाळा पालकांकडून मोठ्या प्रमाणात फी वसूल करतात आणि अनेक शाळांचा वार्षिक नफा कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे. मात्र, निवृत्तीनंतर या शिक्षकांच्या हाती केवळ भविष्य निर्वाह निधीची (एढऋ) तुटपुंजी रक्कम उरते, ज्यातून औषधोपचार आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. सरकारी आणि अनुदानित शाळांप्रमाणेच या शाळांतील कर्मचाऱ्यांनाही पेन्शनचा हक्क मिळावा, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली आहे.

सध्याच्या महाराष्ट्र खाजगी शाळा नियमावली, १९८१ मध्ये स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतनाची स्पष्ट तरतूद नाही. ही कायदेशीर उणीव दूर करण्यासाठी नियमावलीत तातडीने दुरुस्ती करण्याची विनंती असोसिएशनने केली आहे.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी अशा सर्वांनाच या तरतुदीचा लाभ मिळावा, जेणेकरून त्यांना सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने जगता येईल, असे निवेदनात म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी या विषयात सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घेतल्यास राज्यातील हजारो कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे. आता राज्य सरकार या नफेखोर शाळा व्यवस्थापनांविरोधात कोणती भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

सोशल मीडिया, मोबाईलच्या विळख्यातून विद्यार्थ्यांना बाहेर काढणार 'ध्यान'

■ **महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. ३ :**

मोबाईलचा अतिवापर, टेलिव्हिजन आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे आजच्या विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रतेचा अभाव आणि मानसिक ताणतणाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. या समस्येवर प्रभावी उपाय म्हणून पालघर जिल्ह्यातील वाडा येथील परळी आश्रमशाळेत ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान विशेष ध्यान (मेडिटेशन) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'सर्च विदिन फाउंडेशन'चे संस्थापक अध्यक्ष अमोल काजरोळकर यांनी या शिबिरात मार्गदर्शकाची भूमिका बजावली.

या तीन दिवसीय शिबिरात अमोल काजरोळकर यांनी ध्यानाच्या माध्यमातून स्मरणशक्ती कशी सुधारावी आणि मनाची एकाग्रता कशी टिकवून धरावी, याचे सविस्तर मार्गदर्शन केले. ताणतणाव नियंत्रण आणि मानसिक आरोग्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ध्यानधारणा कशी उपयुक्त ठरते, याचे प्रात्यक्षिक धडेही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिले. मोबाईलच्या युगात विचलित होणारे लक्ष पुन्हा अभ्यासावर केंद्रित करण्यासाठी ध्यानाशिवाय दुसरा पर्याय नाही, असे त्यांनी सांगितले.

अमरावती विमानतळास अजितदादांचे नाव देण्याची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३ :**

अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर अमरावतीचे बेलोरा विमानतळ लोकार्पित झाले आहे. या विमानतळाच्या उभारणीसाठी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा सकारात्मक सहभाग लाभला होता. त्यामुळे अमरावती विमानतळास स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी अमरावती अखबारचे संपादक ऋषिकेश शर्मा यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापु तसेच राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठविले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी राज्याच्या विकासासाठी, पायाभूत सुविधांसाठी तसेच जनहिताशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये मोलाची भूमिका बजावली. परिणामी, अमरावती येथील विमानतळाला अजितदादा पवार यांचे नाव देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

फेसबुकचा वाढदिवस!

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २२ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा बाविसावा वाढदिवस आहे.

आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या तीनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले.

हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि खिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २२ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९१२२५४६२९५

जगातील जवळपास पंधरा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे.

फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला.

इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते.

फेसबुकने आता वापरकर्त्यांसाठी ए आय ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे वापरकर्ते ए आय च्या मदतीने आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात मिळवू शकतात. तसेच ए आय चा वापर करून आपले फोटो, व्हिडिओ, रिल्स, व्हिडिओ शेअर करू शकतात. फेसबुकवर दररोज अब्जावधी फोटो, व्हिडिओ आणि रिल्स शेअर केले जातात. तसेच फेसबुकवर दररोज अब्जावधी पोस्टचा पाऊस पडतो. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.

फेसबुकवर एका वापरकर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल.

हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. आज इंस्टाग्रामवर अधिक वेळ घालवत असली तरी फेसबुक ही त्यांना तितकेच प्रिय आहे. फेसबुकवर सर्वच वयोगटातील लोकांचे अकाऊंट आहे.

प्रत्येकाला फेसबुक जवळचा वाटतो. फेसबुक नंतर अनेक सोशल नेटवर्किंग साईट आल्या पण फेसबुकने आपला दर्जा कायम ठेवला त्यामुळेच २२ वर्ष होऊनही फेसबुकची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे.

■ ■ ■

नाशिकच्या महापौरपदासाठी भाजपच्या हिमगौरी आडके निश्चित

उपमहापौर मच्छिन्द्र सानप : ६ फेब्रुवारीला निवडणूक प्रक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी**
नाशिक, दि. ३ :

येथील महापालिकेच्या महापौर-उपमहापौर पदासाठी शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी निवडणूक होत आहे. सभागृहात बहुमतापेक्षाही अधिक म्हणजे ७२ सदस्य असलेल्या भारतीय जनता पक्षाने महापौरपदासाठी हिमगौरी आडके यांच्या तर उपमहापौरपदासाठी मच्छिन्द्र सानप यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे.

नाशिकचे महापौर यंदा सर्वसाधारण महिला गटासाठी असल्याने सुरुवातीपासूनच हिमगौरी आडके यांच्या नावाची चर्चा होती. इतरही नावे चर्चेत असली तरी मोठा राजकीय वारसा लाभलेल्या आडके यांना पक्षाने लिफ्ट दिली आहे. हिमगौरी आडके या माजीमंत्री तथा भाजपचे जेष्ठ नेते स्व. डॉ. दौलतराव आहेर यांची पुतणी, चांदवडचे आमदार डॉ. राहुल आहेर यांची चुलत बहीण, तथा बाळासाहेब आहेर यांची कन्या आहे.

हिमगौरी यांचे पिताश्री हेही नगरसेवक व स्थायी समितीचे सभापती होते तर त्यांच्या मातोश्री प्रा. शोभना आहेर या उपमहापौर होत्या. हिमगौरी यांनीही गेल्या पंचवार्षिकमध्ये स्थायी समितीचे सभापतिपद भूषविले आहे. ज्या वेळेला नाशिकचे महापौरपद सर्वसाधारण महिलेसाठी खुले झाले त्याचवेळेस हिमगौरी आडके याच महापौरपदी विराजमान होतील अशी गटकळ बांधली जात होती.

उपमहापौरपदासाठीही अनेक नावे चर्चेत होती. अखेर माजी आमदार बाळासाहेब सानप यांचे पुत्र मच्छिन्द्र सानप यांच्या नावावर पक्षाने शिक्कामोर्तब केले. मच्छिन्द्र सानप यांची ही दुसरी टर्म आहे.

मच्छिन्द्र सानप यांचे पिताश्री बाळासाहेब सानप यांनी नाशिक शहराचे उपमहापौर आणि महापौर अशी दोन्ही पदे भूषविली आहेत. नवनिर्वाचित महापौर-उपमहापौर यांना अडीच वर्षाचा कालावधी मिळणार असला तरी पक्षाने सव्वा वर्षाचे महापौर-उपमहापौरपद करण्याची तयारी चालविली असल्याची चर्चा आहे.

तसे झाले तर सातव्या पंचवार्षिकमध्ये चार महापौर व चार उपमहापौर होऊन आठ जणांना संधी मिळू शकेल. मंगळवारी (दि. ३) महापौर-उपमहापौर पदांसाठी अर्ज दाखल करण्यासाठी हिमगौरी आडके, मच्छिन्द्र सानप यांच्या समवेत आमदार राहुल ढिकले, भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांच्यासह पदाधिकारी, नेते आणि भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

औपचारिक प्रक्रिया

महापालिका सभागृहात भाजपचे सर्वाधिक ७२ सदस्य आहेत. ही संख्या बहुमताच्या आकड्यापेक्षाही अधिक असल्याने भाजपचे महापौर-उपमहापौर होतील यात शंका नाही. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता निवडणूक प्रक्रिया सुरू होईल. विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून जिल्हाधिकारी पीठासीन अधिकारी म्हणून काम पहाणार आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली प्रथम महापौरांची निवड होईल. त्यानंतर नवनिर्वाचित महापौरांच्या अध्यक्षतेखाली उपमहापौरांची निवड होईल.

महासागर

बुधवार, दि. 4 फेब्रुवारी 2026

अमरावती

पान 3

एमआयडीसीतील सरस्वती एग्रो इंडस्ट्रिजला भीषण आग

रात्री साडे आठच्या सुमारास गोदामातून आग | लक्षावधींचे नुकसान, जीवितहानी नाही

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.3)- राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अमरावती एमआयडीसी परिसरात असलेल्या सरस्वती एग्रो इंडस्टिज या तेल गाळप करणाऱ्या कंपनीत मंगळवारी रात्री साडे आठ वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत लक्षावधी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, सुदैवाने जीवितहानी झाल्याची कोणतीही माहिती उशिरापर्यंत समोर आली नव्हती.

अमरावती एमआयडीसीतील ए-22 या भूखंडावर हा कारखाना असून येथे सरकी तसेच अन्य तेलबियांपासून तेल गाळण्याचा व्यवसाय केला जातो. कारखान्यातील गोदामात मोठ्या प्रमाणात सरकी, ढेप आणि तेलबियांचा साठा होता. याच गोदामातून अचानक आगीच्या ज्वाळा उसळल्या आणि क्षणार्धात आग संपूर्ण गोदामासह इतर भागात पसरली. त्यामुळे परिसरात एकच अफरातफर उडाली.

घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिस आणि अग्निशमन दलाला तातडीने कळविण्यात आले. अग्निशमन दलाची एकामागोमाग एक अशी दहापेक्षा अधिक वाहने घटनास्थळी दाखल झाली. रात्री उशिरापर्यंत आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, आगीची तीव्रता मोठी असल्याने रात्री दहा वाजेपर्यंतही आग पूर्णपणे आटोक्यात आली नव्हती. परिसरात सर्वत्र धुराचे साम्राज्य पसरले होते. आग लागण्याचे नेमके कारण स्पष्ट झाले नसले तरी शॉर्ट सर्किटमुळे ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. घटनास्थळी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पंढरी (बटुळा) शिवारात पट्टेदार वाघाचा मृतदेह आढळला

- महेंद्री बनसंवर्धन क्षेत्रातील घटना
- शवविच्छेदनानंतर घटनास्थळीच अग्नीदाह
- मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट

महासागर प्रतिनिधी

वरुड, (दि. 3) - तालुक्यातील पंढरी (बटुळा) परिसरात पट्टेदार वाघाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी सकाळपासूनच घटनास्थळी तळ ठोकून होते. वाघाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचा शोध घेण्यासाठी तपास सुरू असून आज सकाळी मृतदेहाचे शवविच्छेदन करून त्याला घटनास्थळीच अग्नीदाह देण्यात आला.

महेंद्री बनसंवर्धन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या पंढरी शिवारात वनविभागाचे कर्मचारी नियमित गस्तीवर असताना जंगलातील एका भागातून तीव्र दुर्गंधी येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. संशय आल्याने त्यांनी त्या ठिकाणी पाहणी केली असता जंगली प्राण्याचा मृतदेह आढळून आला. तत्काळ ही माहिती वरुडचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे यांना देण्यात आली. त्यानंतर वरुड वनपरिक्षेत्र कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहणीअंती हा मृतदेह पट्टेदार वाघाचा असल्याचे स्पष्ट झाले.

ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्यानंतर अमरावती येथील वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी काही तासांतच घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून वाघाच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याच ठिकाणी त्याला अग्नीदाह देण्यात आला.

मृत वाघाचे वय अंदाजे चार ते पाच वर्षे असावे, असा प्राथमिक अंदाज आहे. महेंद्री बनसंवर्धन क्षेत्रात वाघ, बिबट्यासह विविध जंगली प्राण्यांचा वावर असल्याची चर्चा आधीपासूनच होती. या घटनेमुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वन्यजीवांचा वावर असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दरम्यान, वाघाचा मृत्यू नैसर्गिक आहे की घातपात झाला आहे, याबाबत सखोल तपास सुरू आहे. नागपूरहून 'रुबी' नावाचा शोधक श्वान (डॉग स्क्वॉड) घटनास्थळी दाखल झाला असून त्याच्या माध्यमातून सुगावे मिळतात का, याचा प्रयत्न केला जात आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

ट्रान्सफॉर्मर चोरी

अमरावती - नांदगावपेठ पोलीस स्टेशन परिसरातील एमआयडीसी संकुलातील सूर्यलक्ष्मी कॉटन कंपनीचे प्रत्येकी 10 हजार 900 किमतीचे दोन ट्रान्सफॉर्मर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी महावितरणचे कर्मचारी राहुल ढोणे (वय 41) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शौचास गेली, परतलीच नाही!

अमरावती - बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीतील अंजनगावबारी रोडवरील वीटभट्टी संकुलात राहणारी एक अल्पवयीन मुलगी शौचास जाण्यासाठी घराबाहेर पडली होती.

तूर ढिगाराला लावली आग

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 3) - मंगरुळ दस्तगीर पोलीस स्टेशन परिसरातील बुरहानपूर शेत शिवारात अज्ञात कारणावरून तूर पिकाच्या ढिगाऱ्यांना आग लावल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शेतकऱ्याच्या तक्रारीवरून एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चिंचपूर (ता. धामणगाव रेल्वे) येथील शेतकरी वृषभ गजानन वाणी (वय 29) यांची बुरहानपूर शिवारातील सर्व्हे क्रमांक 19/1 मध्ये 8 एकर जमीन आहे. यावर्षी त्यांनी 6 एकर क्षेत्रात तूर पिकाची लागवड केली होती. शनिवार, 31 जानेवारी रोजी त्यांनी तूर पीक कापून शेतात सुमारे 500 ढिगारे साठवून ठेवले होते. दरम्यान, 2 फेब्रुवारी रोजी तूर ढिगाऱ्यांना आग लावल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ डायल 112 वर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या घटनेत सुमारे 45 क्विंटल तूर जळून खाक झाली असून अंदाजे 3,15,000 रुपयांचे नुकसान झाल्याचे नोंदविण्यात आले आहे. या प्रकरणी वृषभ वाणी यांच्या तक्रारीवरून वासद (ता. धामणगाव रेल्वे) येथील आशिष जगताप याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दहावी, बारावी परीक्षांसाठी 'कॉपीमुक्त अभियान'

अमरावती - दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हास्तरीय दक्षता समितीची सभा पार पडली. या सभेत या परीक्षा निकोप आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने दहावी आणि बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुघल, योजना शिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे आदी उपस्थित होते.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा ह्या दि. 10 फेब्रुवारी ते 18 मार्च 2026 या कालावधीत करण्यात आल्या आहेत. दहावीच्या परीक्षेला 38,531 विद्यार्थी 187 केंद्रांवरून परीक्षा देणार आहेत. बारावीसाठी 35,934 विद्यार्थी 137 केंद्रांवरून परीक्षा देतील. परीक्षेच्या कामकाजासाठी एकूण 22 केंद्रे स्थापित करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रावर गैरप्रकार रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. परीक्षा केंद्राच्या 100 मीटर परिसरात पोलीस अधिनियम 37 (1) (3) लागू करण्यात आला आहे. केंद्राच्या 500 मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स दुकाने परीक्षा कालावधीत बंद राहतील. सर्व केंद्रांवर हत्यारी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. मंडळाने जाहीर केलेल्या उपद्रवी केंद्रांवर विशेष प्रभावी यंत्रणा राबविली जाईल.परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी वीज वितरण कंपनीला विद्युत पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, विद्यार्थ्यांनी केंद्रावर वेळेत पोहोचावे यासाठी परिवहन विभागाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अनधिकृत पिस्तुलप्रकरणी 3 वर्षांची शिक्षा

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 3) - गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील महेंद्र कॉलनी परिसरात विनापरवाना पिस्तूल बाळगणाऱ्या आरोपीला न्यायालयाने दोषी ठरवत तीन वर्षांची सक्तमजुरी आणि दोन हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक 9 च्या न्यायाधीश मेघना आशिष देशमुख यांनी हा निकाल दिला. ही घटना 23 ऑगस्ट 2022 रोजी घडली होती. गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक नरेशकुमार मुंडे हे पोलिस अधिकारी राजुप्पा, फिरोज खान, सतीश देशमुख व निवृत्ती कक्कड यांच्यासह शहरात गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे महेंद्र कॉलनी येथील पान दुकानाजवळ छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान शेख मोहसीन शेख सलीम (रा. हबीब नगर, अमरावती) याच्याकडून विनापरवाना पिस्तूल जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या पिस्तूलची किंमत अंदाजे 30 हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरोधात शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणात विशेष सहाय्यक सरकारी वकील राहुल कावरे यांनी 6 साक्षीदार तपासले. साक्षीदारांच्या साक्षी आणि पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. न्यायालयीन कामकाजात अमोल क्षीरसागर व अरुण हटवार यांनी विशेष सहाय्यक सरकारी वकील राहुल कावरे यांना सहकार्य केले.

गुरुकुंज मोझरी येथे अजितदादांच्या अस्थींचे विसर्जन

तिवसा - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या अस्थि कलशाचे गुरुकुंज मोझरी येथे भावपूर्ण वातावरणात आगमन झाले. ध्यानसाधनेच्या वेळी श्रद्धापूर्वक अस्थिदर्शन व नंतर विधीवत अस्थी विसर्जन करण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार अस्थि कलश गुरुकुंज मोझरी येथील अखिल

गुरुदेव सेवा मंडळात 3 फेब्रुवारी रोजी सकाळी अमरावती येथून भावपूर्ण वातावरणात आणण्यात आला. सकाळी 5 वाजून 45 मिनिटांनी ध्यानसाधनेच्या वेळेस अत्यंत श्रद्धाभावाने अस्थिदर्शन ठेवण्यात आले. प्रारंभी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महा-समाधी स्थळी अस्तिदर्शनासाठी कलश ठेवण्यात आला. 'सप्रेम जयगुरुदेव'च्या घोषाने संपूर्ण गुरुकुंज परिसर भक्तिमय व शोकाकुल वातावरणाने भारावून गेला होता.त्यानंतर गुरुकुंज मोझरी येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या अस्थी विसर्जन स्थळी विधीवत त्यांच्या अस्थी विसर्जनाचा धार्मिक विधी पार पाडण्यात आला.

जीएमसी साठी 'मोसिकॉल'च्या 24 एकर जमिनीचा पर्याय

प्रदीप बाजडांचे पालकमंत्र्यांना निवेदन

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.3)- शहरासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (जीएमसी) प्रकल्पाला आवश्यक असलेल्या जागेचा प्रश्न गेल्या दोन वर्षांपासून अद्याप मार्गी लागलेला नाही. परिणामी, कोट्यवधी रुपयांच्या या प्रकल्पाचा पुढील विकास आराखडा कागदावरच अडकून पडला आहे. या पार्श्वभूमीवर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेली महाराष्ट्र राज्य तेलबिया व्यापार व औद्योगिक महामंडळाची (मोसिकॉल) सुमारे 24 एकर जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी पुढे आली आहे.

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख प्रदीप बाजड यांनी यासंदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. अमरावतीचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सध्या कार्यरत असले तरी रुग्णसेवा, निवासी डॉक्टरांचे निवासस्थान, विद्यार्थ्यांचे वसतिगृह तसेच शैक्षणिक व उपचारात्मक पायाभूत सुविधा विस्तारासाठी पुरेशी जमीन उपलब्ध नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आलियाबाद येथील जागा गैरसोयीची

दुसरीकडे, कोंडेश्वर परिसरातील आलियाबाद (वडद) येथे 11.29 हेक्टर जमीन वैद्यकीय महाविद्यालयासाठी मंजूर करण्यात आली आहे. मात्र ही जागा शहरापासून 15 ते 20 किलोमीटर अंतरावर असल्याने रुग्णांसाठी ती गैरसोयीची ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या निर्णयावर फेरविचार करून नागपूर महामार्गालगत किंवा शहरालगतची सोयीची जागा निवडावी, अशी मागणी यापूर्वी आमदार संजय खोडके यांनीही विधिमंडळात केली होती.सुमारे 600 ते 700 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पासाठी योग्य व सुलभ ठिकाणाची निवड झाली नाही, तर एवढा मोठा सार्वजनिक खर्च अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यात अपयशी ठरू शकतो, अशीही चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता शासन कोणता निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्याच्या दुर्गम भागातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण अमरावतीत उपचारासाठी येतात. त्यांना तात्काळ व सुलभ आरोग्यसेवा मिळण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालय शहराच्या मध्यभागी असणे अत्यावश्यक असल्याचे मत मांडले जात आहे. सध्या जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) आणि जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) ही दोन्ही प्रमुख शासकीय रुग्णालये मध्यवस्तीत आहेत. मोसिकॉलची जमीन या दोन्ही रुग्णालयांच्या निकट असून, गेल्या अनेक वर्षांपासून ती पडीक अवस्थेत आहे. विशेष म्हणजे ही जमीन शासनाच्याच मालकीची असल्याने ती आरोग्य शिक्षणासाठी वापरल्यास कोणताही कायदेशीर अडथळा येणार नाही, असा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, या जमिनीच्या विक्रीसाठी लिलाव प्रक्रिया प्रस्तावित असल्याची चर्चा आहे. मात्र जनहिताचा विचार करता ही प्रक्रिया तातडीने स्थगित करून संपूर्ण जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे वर्ग करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. खासगी वापरापेक्षा सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी या जमिनीचा उपयोग झाल्यास शहर व जिल्ह्यातील नागरिकांना दीर्घकालीन लाभ होईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

भाजप-राष्ट्रवादीवर आत्मचिंतनाची वेळ

अमरावती महापालिकेच्या निवडणूकीतून घसरलेला जनाधार उघड | फाजिल आत्मविश्वास ठरला अडचणीचा

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 3) - अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी दिलेल्या त्रिशंकू कौलामुळे सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला होता. अखेर राजकीय डावपेचात भाजपने मित्रपक्षांच्या मदतीने सत्ता स्थापन करत आहे, तरी या निकालाने भाजपसह राष्ट्रवादीच्या नेत्यांसमोर गंभीर आत्मचिंतनाची वेळ आणली आहे. घसरलेला जनाधार, अपयशी लक्ष्यपूर्ती आणि फाजिल आत्मविश्वास ही या निवडणुकीची ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत.

87 झालेली ही निवडणूक अपेक्षेपेक्षा अधिक चुरशीची

ठरली. कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने मतदारांचा संदेश स्पष्ट होता. भाजपने खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, माजी आमदार प्रविण पोटे व निवडणूक प्रमुख आ. संजय कुटे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली. मात्र 55 प्लसचे लक्ष्य ठेवूनही भाजपला केवळ 25 जागांवर समाधान मानावे लागले. 2017 मध्ये असलेले 45 चे संख्याबळ थेट 25 वर घसरल्याने पक्षाची चिंता वाढली आहे.

शिवसेनेसोबत युती नसल्याने झालेले मतविभाजन, बंडखोरी, उमेदवारी वाटपावरून निर्माण झालेली अंतर्गत नाराजी आणि पक्षविरोधी कृत्यांचा फटका भाजपला बसल्याचे चित्र आहे. सत्ता स्थापनेसाठीही भाजपला इतर नगरसेवकांच्या पाठबळावर अवलंबून राहावे लागले.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने 87 उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले; मात्र केवळ 11 उमेदवार विजयी झाले. अपेक्षा आणि वास्तवातील या मोठ्या तफावतीमुळे फाजिल आत्मविश्वासामुळेच पराभव ओढवला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

या निवडणुकीत एमआयएम आणि युवा स्वाभिमानसारख्या पक्षांनी शहरातील आपली पकड अधिक घट्ट होत असल्याचे प्रस्थापित पक्षांना दाखवून दिले. काँग्रेसकडे संधी असतानाही विरोधकांची एकत्रित मोट बांधण्यात अपयश आल्याने सत्ता स्थापनेचे प्रयत्न निष्फळ ठरले. राष्ट्रवादीने भाजपला साथ दिल्याने विरोधकांची सत्ता स्थापनेची शक्यता दिवास्वप्न ठरली. एकूणच, अमरावती महापालिकेच्या सत्ताकारणातून भाजप आणि राष्ट्रवादी दोघांसाठीही हा इशाराच आहे— जनाधार गृहीत धरून चालणार नाही; आत्मपरीक्षणाशिवाय पुढचा राजकीय प्रवास कठीण ठरणार आहे.

ट्रम्प टॅरिफमुळे बदलले भारताचे धोरण

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी गेल्या महिन्यात स्वित्झर्लंडमधील दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या मंचावरून सांगितले होते की, जगाची जुनी व्यवस्था 'मोडत' आहे. आता मध्यम शक्ती असलेल्या देशांना एकत्र आणून काम करावे लागेल. दावोसमध्ये आपल्या भाषणात कार्नी यांनी ट्रम्प प्रशासनाचा उल्लेख केला नाही किंवा त्या अमेरिकन शुल्कांचा (टॅरिफ) उल्लेख केला नाही, ज्यामुळे जुनी जागतिक व्यवस्था डळमळीत झाली. आपल्या भाषणात त्यांनी थेट भारताचे नाव घेतले नसले तरी, त्यांचा इशारा भारताकडेच होता.

भारत सध्या दोन मोठ्या दबावांमध्ये उभा आहे. एका बाजूला अमेरिकेची बदलती धोरणे आहेत तर दुसऱ्या बाजूला चीनची वाढती आक्रमकता. अशा परिस्थितीत भारत आता पारंपरिक भागीदारांच्या पलीकडे जाऊन जगाच्या इतर भागांमध्ये नवीन मित्र शोधत आहे.

या घटनेच्या बरोबर एका आठवड्यानंतर, भारतीय पंतप्रधान मोदी नवी दिल्लीत युरोपियन (एव) प्रमुख उर्सुला वॉन डेर लेयेन यांच्यासोबत उभे होते. दोघांनी सुमारे १८ वर्षांपासून रखडलेल्या एका मोठ्या व्यापार कराराची घोषणा केली, ज्याला त्यांनी मदर ऑफ ऑल डील्स असे म्हटले.

या करारामुळे सुमारे २ अब्ज लोकांची बाजारपेठ तयार होईल. हा केवळ व्यापार नाही, तर त्या नवीन आंतरराष्ट्रीय प्रणालीचा भाग आहे, ज्यात अमेरिकेची भूमिका कमकुवत झाल्यानंतर इतर देश एकत्र येऊन नवीन रचना उभी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

आज भारत अशा देशांमध्ये समाविष्ट आहे ज्यांची मते आणि निर्णय जागतिक राजकारणावर परिणाम करू लागले आहेत. १४० कोटी लोकसंख्येसह हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. भारताची अर्थव्यवस्था देखील जपान आणि जर्मनीसह जगातील टॉप-५ मध्ये समाविष्ट झाली आहे, तरीही, दरडोई उत्पन्न या देशांपेक्षा खूप कमी आहे.

पंतप्रधान मोदींची आत्मनिर्भर भारताची संकल्पना आता थोडी मवाळ होताना दिसत आहे. भारतात ही धारणा दीर्घकाळापासून आहे की स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी इतर देशांशी जास्त आर्थिक संबंध नसावेत. परंतु युरोप, कॅनडा आणि इतर देश असा युक्तिवाद करत आले आहेत की एकत्र व्यापार केल्यानेच देश मजबूत होतात.

भारत आणि इतर महत्त्वाच्या देशांमधील संबंधांमध्ये गेल्या वर्षी ब्रिटनसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे गती दिसू लागली. हा करार बराच काळ रखडला होता. त्यानंतर डिसेंबरमध्ये ओमान आणि न्यूझीलंडसोबतही असेच महत्त्वाचे करार करण्यात आले. हे द्विपक्षीय करार भारताच्या धोरणात बदल होत असल्याचे दर्शवतात.

गेल्या काही आठवड्यांत जर्मनी, जपान, यूएई आणि सौदी अरेबियाचे मोठे नेते नवी दिल्लीत आले. प्रत्येक भेटीत भारतासोबतचे संबंध पुढे नेण्यावर चर्चा झाली आणि नवीन करार करण्यात आले.

फेब्रुवारीमध्ये ब्राझीलचे अध्यक्ष लुला दा सिल्वा देखील भारतात येणार आहेत.

त्यानंतर मार्क कार्नी देखील भारतात येतील. अशी अपेक्षा आहे की ते मार्चमध्ये कॅनडाच्या एका शिष्टमंडळासोबत नवी दिल्लीत येतील आणि आणखी एका व्यापार कराराला पुढे नेतील.

गेल्या वर्षी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून येणाऱ्या बहुतेक वस्तूंवर ५०% शुल्क लावले होते. यात अर्धे प्रतिशोधात्मक शुल्क होते आणि अर्धे रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल शिक्षा म्हणून लावलेला अतिरिक्त कर होता. इथूनच भारत-अमेरिकेच्या संबंधात बदल सुरू झाला होता. त्यापूर्वी २५ वर्षांपर्यंत अमेरिका आणि भारताचे संबंध मजबूत करण्याचा प्रयत्न होत राहिला होता, विशेषतः चीनच्या वाढत्या ताकदीचा मुकाबला करण्यासाठी.

मात्र, सोमवारी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरील रेसिप्रोकल शुल्क (जशास तसे) २५% वरून १८% पर्यंत कमी केले आहे. व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की भारतावर फक्त १८% शुल्कच लागेल.

अमेरिका रशियन तेल खरेदी केल्यामुळे लावलेला २५% टॅरिफ (शुल्क) काढून टाकेल. यामुळे आता पुन्हा भारत आणि अमेरिकेचे संबंध सुधारण्याची अपेक्षा आहे.

सप्लाय चेनमध्ये
भारताची पकड कमकुवत

वॉशिंग्टन येथील ब्रुकिंग्स इन्स्टिट्यूशनच्या वरिष्ठ फेलो तन्वी मदान यांच्या मते, भारताला चीनसोबत तेच करायचे होते जे चीनने पाश्चात्त्य देशांसोबत केले. म्हणजे त्यांची प्रतिभा आणि तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतः एक मजबूत प्रतिस्पर्धी बनायचे होते.

आता यात भारताची सर्वात मोठी कमतरता ही आहे की, जगाच्या पुरवठा साखळीत त्याच्या हातात असे कोणतेही मजबूत पत्ते नाहीत, ज्यामुळे तो इतरांवर दबाव टाकू शकेल. जसे चीनकडे रेअर अर्थ खनिजे आहेत, किंवा तैवान आणि नेदरलँड्सकडे प्रगत चिप बनवण्याचे तंत्रज्ञान आहे, ज्यामुळे इतर देश त्यांच्यावर अवलंबून असतात.

भारताकडे सध्या असे काहीही नाही. आज परिस्थिती अशी आहे की, चीनचा माल जगभरातील बाजारात पसरलेला आहे आणि चिनी सैनिक हिमालयाच्या त्या भागात ठाण मांडून आहेत, ज्यावर भारत आपला दावा करतो.

अशा परिस्थितीत भारताला चीनच्या तुलनेत पूर्वीपेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय समर्थनाची गरज आहे. जर ही मदत अमेरिकेकडून मिळाली नाही, तर इतर देशांना पुढे यावे लागेल.

अमेरिका भारताची
सर्वात मोठी बाजारपेठ

अमेरिका भारताची सर्वात मोठी बाजारपेठ आहे आणि ५०% शुल्क (टॅरिफ) लागल्यानंतर तेथे भारताच्या निर्यातीत सुरुवातीच्या महिन्यांत मोठी घट झाली होती. गेल्या वर्षी भारतीय चलन डॉलरच्या तुलनेत ७% कमकुवत झाले.

भारताने याची भरपाई इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करून केली, कारण यावर शुल्क (टॅरिफ) लागत नाही. त्याचबरोबर इतर देशांमध्येही आपली बाजारपेठ वाढवली. परिणामी एकूणच भारताची निर्यात गेल्या वर्षी वाढली.

या नवीन व्यापार करारांसोबतच देशांतर्गत होत असलेल्या आर्थिक सुधारणा भारताला आणखी बळकटी देऊ शकतात. अर्थशास्त्रज्ञ रजत कथुरिया म्हणतात, भारतात अनेकदा संकटाचे रूपांतर सुधारणेच्या संधीत केले जाते. जसे की, छतातून पाणी गळू लागले की, संपूर्ण घरच दुरुस्तीसाठी तयार केले जाते.

शो मस्ट गो ऑन..

सुनेत्राताईंचं खरंच काय चुकलं? जीवनातल्या 'शो मस्ट गो ऑन' या तत्त्वानुसार त्यांनी नवऱ्याचा पक्ष आणि त्याच्या पदाची जबाबदारी स्वीकारली तर घराणेशाही मानणाऱ्यांना इतक्या मिरच्या झोंबण्याचं कारणंच नाही आणि, घराणेशाही विरोधकांनाही यावर फारसा आक्षेप घेण्याची गरज नाही. कारण, 'डोन्ट अंडरएस्टिमेट द पॉवर ऑफ पवार' वगैरे डायलॉगनुसार सुनेत्राताईसुद्धा जन्मापासूनच राजकारण शिकत आल्या आहेत, हे लक्षात घ्यायला हवं. अर्थात, आधी त्या पाटील होत्या आणि आता पवार आहेत, हाच काय तो फरक!

त्यामुळे, अजितदादांचं धक्कादायकरीत्या जाणं हे सर्वांनाच हुरहूर लावणारं असलं तरी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्राताई पवारांना शुभेच्छा देऊन त्यांची पुढची वाटचाल समाजहिताची कशी राहील, याकडे आपण लक्ष ठेवलं पाहिजे. पण, सध्या त्यांचेच कुटुंबीय हे मानत नाहीत, असेच दिसून येत आहे. असो, तो पवारांचा घरगुती प्रश्न आहे, त्यावर आपण कशाला चर्चा करायची?

स्वप्नील सावरकर
savarkarswapnil@gmail.com

पण, राजकारण, समाजकारण हे सार्वजनिक जीवनाचा भाग असल्याने त्यावर बोलण्याचा हक्क तुम्हा-आम्हा सर्वांनाच लोकशाहीनं दिलाय म्हणूनच, सध्या सोशल मीडियावर जी बडबड सुरू आहे आणि ती कायम राहणार!

तसं पाहिलं तर, शरद पवार महाराष्ट्रातलं अत्यंत मोठं राजकीय नेतृत्व असलं तरी त्यांना आजवर पॉझिटिव्ह आणि निगेटिव्हच्या तराजूतच तोललं गेलंय. त्यांनी आजवर अनेकदा शब्द, वचन, भाकरी फिरवण्याचीच कामगिरी केली आहे, हे सोदाहरण सिद्ध केलं गेलंय. त्यांनीही अनेकदा आपल्याच भूमिका सातत्याने बदलल्यात.

अगदी दुसरे पक्ष फोडताना आणि स्वतःचा पक्ष फुटतानाही, त्यांनी स्वतःची ही इमेज कायम ठेवली आहे. अन्यथा, सुनेत्रा पवारांच्या शपथविधीपूर्वी पत्रकार परिषद घेऊन स्वतःच्याच कुटुंबातील दरी समोर आणून गैरसमज वाढवण्याचं कर्म त्यांनी सहेतू केलं नसतं.

जसं अजितदादांचं निधन हे घातपात नसून अपघात असल्याचं ठामपणे सांगून (कोणतीही चौकशी सुरूही झाली नसताना) पवारांनी एक वेगळीच भूमिका घेतली, तशीच सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबाबतही घेतली. त्यानंतर, राजकीय पोपटही त्यानुसार पोपटपंची करू लागले, हे आपण पाहतच आहोत.

थोडक्यात काय, तर स्वतःच्याच कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम वाढवण्यावर त्यांनी भर दिला. राजकारणात जेव्हा तुम्ही लोकांना समजवू शकत नाही तेव्हा संभ्रमात टाका, असं म्हटले जाते. इंग्रजीतल्या if u cannot convince then confuse them, या उक्तीनुसारच शरद पवार वयाच्या ८६ व्या वर्षीही वागत आहेत, असंच म्हणावं लागेल.

■ ■ ■

अभ्यास, बांधिलकी आणि विवेकाचा दीपस्तंभ
डॉ. श्रीनिवास विष्णू खांदेवाले

शिक्षण हे केवळ पोटापाण्याचे साधन नसून समाजाला दिशा देणारे, विवेक जागवणारे आणि परिवर्तन घडवणारे प्रभावी माध्यम आहे.ही जाणीव ज्या व्यक्तिमत्त्वांच्या संपूर्ण आयुष्यभराच्या वाटचालीतून प्रत्ययास येते, त्यांपैकी एक अत्यंत आदरणीय नाव म्हणजे ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ, निर्भीड विचारवंत आणि निष्ठावान शिक्षणतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास विष्णू खांदेवाले. महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक विश्वात त्यांनी दिलेले योगदान हे केवळ विद्यापीठाच्या भिंतींत अडकून न राहता समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचणारे आहे. म्हणूनच २०२६ चा स्व. धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार त्यांना जाहीर होणे, हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून मूल्याधिष्ठित शिक्षणसंस्कृतीचा गौरव आहे.

---

६ नोव्हेंबर १९३६ रोजी आकोट (जि. अकोला) येथे जन्मलेल्या डॉ. खांदेवाले यांनी आयुष्याच्या सुरुवातीलाच आपली दिशा ठामपणे निश्चित केली. अभ्यास, चिंतन आणि समाजबांधिलकी. नागपूर विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम.ए. पदवी सुवर्णपदकासह प्राप्त करून त्यांनी १९६९ मध्ये पीएच.डी. पूर्ण केली. एल.एल.बी. पदवी संपादन करून त्यांनी आपला वैचारिक आवाका व्यापक केला.

अर्थशास्त्र, कायदा, समाजशास्त्र आणि राजकीय विचार यांचा सुसंवादी मिलाफ त्यांच्या अभ्यासात व लेखनात सातत्याने दिसून येतो. म्हणूनच त्यांचे चिंतन शास्त्रीय न राहता समाजाभिमुख ठरते.

१९५९ ते १९९६ या तब्बल ३७ वर्षांच्या अध्यापन प्रवासात त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी न मानता साधना मानली. यापैकी ३१ वर्षे पदव्युत्तर स्तरावर अध्यापन करताना त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाला आकार दिला.

नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात प्रपाठक म्हणून कार्यरत असताना त्यांनी अध्यापनाला संशोधनाची धार दिली. विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागाचे प्रभारी संचालक म्हणून चार वर्षे जबाबदारी सांभाळताना शैक्षणिक शिस्त व गुणवत्तेची ठाम भूमिका त्यांनी जपली. १४ पीएच.डी. संशोधक आणि ३० एम.फिल. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, ही आकडेवारी नसून ज्ञानपरंपरेचा वारसा पुढे नेण्याचे कार्य आहे.

प्रा. डॉ. प्रशांत विघे
भारतीय महाविद्यालय, अमरावती
९३२६८७७७४९

खरे तर अभ्यासासाठी वय ही संकल्पनाच डॉ. खांदेवाले यांच्या जीवनापुढे लहान ठरते. आज जवळपास ९० वर्षांचे वय असतानाही त्यांची बौद्धिक तल्लखता, शिस्तबद्ध कामाची पद्धत आणि सातत्यपूर्ण अभ्यास तरुण पिढीला लाजवणारा आहे. केंद्र व राज्य सरकारच्या प्रत्येक अर्थसंकल्पावर ते सखोल आर्थिक आणि सांख्यिकी विश्लेषण मांडतात.

आकडेवारीकडे केवळ संख्या म्हणून नव्हे, तर समाजाच्या वास्तवाचे प्रतिबिंब म्हणून पाहण्याची दृष्टी त्यांनी दिली. त्यामुळे अनेक तरुण अभ्यासक, संशोधक आणि शैक्षणिक नेतृत्वाला त्यांच्या लेखनातून अधिकृत, विश्वासार्ह आणि वैचारिक संदर्भ मिळतो, ही बाब त्यांच्या कार्याचे मोठेपण अधोरेखित करते.

डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांचे लेखन हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी प्रतिबिंब आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (क्वरफ), नवी दिल्ली यांच्या सहाय्याने सादर झालेले संशोधन अहवाल पुस्तक रूपाने प्रकाशित झाले आहेत.

एम.ए. स्तरावरील अर्थशास्त्र विषयाची क्रमिक पाठ्यपुस्तके ही अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहेत. गेली सहा दशके मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांतून त्यांचे लेख सातत्याने प्रसिद्ध होत आहेत. विदर्भाच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी त्यांनी लिहिलेली तीन पुस्तके ही भावनेवर नव्हे, तर अभ्यासावर आधारित वैचारिक मांडणी आहेत. वेळूफुले हा त्यांचा कवितासंग्रह त्यांच्या संवेदनशील, मानवी आणि चिंतनशील मनाचे दर्शन घडवतो.

विद्यापीठीय प्रशासन आणि शैक्षणिक संघटनांमधील त्यांची भूमिका तितकीच ठोस व प्रभावी राहिली आहे. नागपूर विद्यापीठाचे दोन वेळा सिनेट सदस्य, दोन वेळा विद्वत सभा सदस्य, तसेच सामाजिक शास्त्रांचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी निर्णयप्रक्रियेत शैक्षणिक मूल्यांना प्राधान्य दिले. Association of University Teachers चे अध्यक्ष म्हणून शिक्षकांच्या प्रश्नांवर त्यांनी निर्भीड भूमिका घेतली. विदर्भ अर्थशास्त्र परिषद व मराठी अर्थशास्त्र परिषद यांचे अध्यक्ष म्हणून मराठी भाषेतून शास्त्रीय विचार मांडण्याची परंपरा अधिक बळकट केली. All India Peace and Solidarity Organization (महाराष्ट्र युनिट) आणि All India Save Education Committee, कोलकाता यांमधील सहभागामुळे त्यांची ओळख राष्ट्रीय पातळीवरही सखोल झाली.

आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही त्यांच्या विचारांना मान्यता मिळाली. २००० मध्ये क्युबा येथील हॅवाना येथे आणि २००३ मध्ये श्रीलंकेतील कोलंबो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांत त्यांनी विकसनशील देशांच्या प्रश्नांवर भारतीय दृष्टिकोन ठामपणे मांडला. जागतिकीकरणाच्या झगमगाटामागील वास्तव त्यांनी अधोरेखित केले.

मॅग्नम फाऊंडेशनचा अर्थद्रष्टा पुरस्कार, पूर्णवाद अर्थशास्त्र पुरस्कार (२००९), गजानन माधव मुक्तीबोध राष्ट्रीय साहित्य संमेलन (२०१६) यांसारखे सन्मान त्यांच्या कार्याची पोचपावती आहेत. सध्या ते नागपूर येथील आर. एस. रुईकर इन्स्टिट्यूट ऑफ लेबर अँड सोशिओकल्चरल स्टडीज चे मानद संचालक म्हणून कार्यरत असून आजही वैचारिक क्षेत्रात सक्रिय आहेत.

डॉ. खांदेवाले यांची खरी ओळख त्यांच्या निर्भीडपणा, प्रामाणिकपणा आणि विवेकनिष्ठेत आहे. व्यक्ती, संस्था किंवा सत्तेचा मुलाहिजा न बाळगता योग्य तेच बोलणे व लिहिणे हे धाडस त्यांनी आयुष्यभर जपले. एवढा अभ्यास, एवढी विद्वत्ता असूनही अहंकाराचा लवलेश त्यांच्या स्वभावात दिसत नाही. नव्या पिढीतील अभ्यासकांचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, हीच त्यांची खरी मोठी माणुसकी आहे. डॉ. गिरीश गांधी फाऊंडेशन, नागपूर यांच्यावतीने दिला जाणारा स्व. धरणीधर गांधी समाज शिक्षक पुरस्कार हा समाजबांधिलकी जपणाऱ्या शिक्षकांसाठीचा मानाचा सन्मान आहे. स्व. धरणीधर गांधी यांच्या मूल्यांशी डॉ. खांदेवाले यांचे आयुष्य पूर्णतः सुसंगत आहे. त्यामुळे हा पुरस्कार त्यांना जाहीर होणे ही सार्थ निवड आहे.

५ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर येथे होणारा हा पुरस्कार वितरण समारंभ मूल्याधिष्ठित शिक्षणाची उज्ज्वल परंपरा अधोरेखित करणारा क्षण ठरेल. खरे तर डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांना हा पुरस्कार मिळणे म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या निःस्वार्थ, निर्भीड आणि समाजाभिमुख कार्याचा गौरव आहे. त्याचबरोबर या पुरस्कारालाही त्या निमित्ताने अधिक उंची प्राप्त होते. खरंच, मोठी माणसे मोठीच असतात आणि काळ त्यांच्या विचारांची उंची मोजत राहतो.

■ ■ ■

शाश्वत सौंदर्याचा ध्यास

असं म्हणतात की सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या डोळ्यात असतं, आणि याही पलीकडे जात ते त्याच्या अंतर्मनातील विचारातून झळकत असतं. जगाकडे बघण्याची विलक्षण सकारात्मक सौंदर्यदृष्टी ज्याच्यात असते तो वाळवंटातही हिरवळ निर्माण करण्याची ताकद ठेवतो. जगण्यातील संवेदनांमध्ये शाश्वत सौंदर्याचा ध्यास बाळगणारा असाच एक अचाट, विलक्षण, दृढ, आणि चैतन्याचा खळखळता झरा असलेला व्यक्ती मी अनुभवला तो म्हणजे ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत सदाशिव मोरे.

कोऱ्या पाटीवर काहीही लिहून पुसणे किती सोपे असते, तुमच्या आमच्या मनाचे असे असते तर समाजाचे किती बरे झाले असते असे म्हणणारे श्रीकांत मोरे यांनी आपले मन पाटीप्रमाणे ठेवले. ज्यावर नकारात्मक अनुभव पुसत त्यातून सुंदर सृजनात्मक अनुभवांची अक्षरेच नेहमी कोरली.

सोलापूर येथे शिक्षणाधिकारी असलेले वडील सदाशिव मोरे व आई मनोरमा मोरे यांच्या पोटी जन्मलेले शेंडेफळ म्हणजे श्रीकांत मोरे. आईवर प्रचंड प्रेम असणाऱ्या श्रीकांत मोरे यांच्यावर वडिलांच्या शिस्तीचा आणि विचारांचा कायम पगडा होता. लहानपणापासून असलेली वाचनाची आवड पुढे साहित्याच्या गोडीमध्ये परावर्तित झाली, ती महाविद्यालयातील साहित्यविषयक सृजनात्मक उपक्रमांतून आणि हे साहित्य प्रेम अधिक व्यापक आणि समृद्ध झाले ते त्यांच्या इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासातून.

त्यांनी महाविद्यालयीन व बीए इंग्रजी वाङ्मयाचे शिक्षण सोलापूर येथील संगमेश्वर महाविद्यालयातून पूर्ण केले तर दयानंद महाविद्यालयातील इंग्रजी वाङ्मयात एमए पूर्ण केले. एमए इंग्लिश करताना इंग्रजी कवि विशेषतः ज्यांनी प्रेम कविता अथवा निसर्ग कविता लिहिल्या त्यापैकी पी.बी.शेली, वर्डस्वर्थ, क्रिट्स, लिल्टन लॉर्ड, बायरन, मेरी शेली, सेक्सपियर त्याबरोबर इतर भाषेतील रोमँटिसीझमचा अभ्यास झाला. यातूनच त्यांची साहित्याची जाणीव प्रगल्भच झाली नाही तर जीवनाकडे बघण्याची शाश्वत सौंदर्यदृष्टी त्यांना प्राप्त झाली. नव्हे त्याचा त्यांनी ध्यासच घेतला.

प्रत्येक गोष्टीमध्ये सौंदर्याचा शोध घेण्याच्या ध्यासानेच त्यांना कोळपेवाडी येथील गौतम पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये लागलेली शिक्षकाची नोकरी, तेथील

इंग्रजाळलेल्या वातावरणाची घेतलेली धास्ती याचे परावर्तन सकारात्मक दृष्टिकोनात त्यांनी केले आणि स्वतःतील आत्मविश्वास मजबूत केला.

ते प्रकर्षाने सांगतात की, या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये जी आत्मविश्वासाची मोट मी बांधली त्याचा मला आयुष्यभर फायदा झाला. एमपीएससी च्या परीक्षेतील दिव्य पार करण्यासाठी अभ्यासासोबतच त्यांनी ही परीक्षा पास झालेल्या व्यक्तींच्या भेटी घेतल्या.

त्यांना उमगले की ही माणसे फार साधी आहेत. ही माणसे या पदापर्यंत पोहोचू शकतात तर आपण का नाही. यातूनच त्यांना माणसे वाचण्याचा आणि जोडण्याचा व्यासंग जडला. ही परीक्षा पास करीत ते अकाउंट ऑफिसर म्हणून रुजू झाले. यानंतर पीएसआय, सेल टॅक्स ऑफिसर, रजिस्टार अशा विविध प्रकारच्या परीक्षा त्यांनी पास केल्या. पण यामध्ये त्यांनी सहकार क्षेत्रातील असिस्टंट रजिस्टारची नोकरी स्वीकारली.

श्रीकांत मोरे म्हणतात की ज्या अकाउंट्स व गणिताशी माझा छत्तीसचा आकडा होता अशाच क्षेत्रामध्ये मला सेवा द्यावी लागली ही माझ्या जीवनातील मोठी विसंगती आहे. पण या विसंगतीचे त्यांनी सुगंधित फुलांमध्ये रूपांतर करून या किचकट, निरस क्षेत्रातही सजीवता निर्माण केली.

ते मोठ्या अभिमानाने सांगतात की सहकार क्षेत्रात काम करीत असताना त्यांनी २५ नागरिक सहकारी बँकांची स्थापना केली आणि अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला. ते सांगतात की, सहकार क्षेत्रात काम करीत असताना त्यांनी साहित्य प्रेम नेहमीच जोपासले.

यातून अनेक साहित्यिक मान्यवरांच्या त्यांच्या ओळख्या झाल्या. सुरुवातीला त्यांनी लिहिलेल्या कवितांना आकाशवाणी पर्यंत पोहोचविण्याचे काम मधुकर कांबळे यांनी केले तर तेथील हार्डीकर साहेबांनी त्यांच्या कवितांना निश्चित दिशा दिली. यातून त्यांच्या कविता फुलत गेल्या.

mahasagarngp@gmail.com

महाविद्यालयातील डॉ. निर्मलकुमार फडकुले आणि हिरेमठ सर यांचे त्यांना नेहमीच मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या रंग भावलेले या काव्यसंग्रहास डॉ.गो.मा. पवार, तसेच इतर दोन कवितासंग्रहांना डॉ. निर्मलकुमार फडकुले, ज्येष्ठ कवी दत्ता हलसगीकर, डॉ. द.ता.भोसले यांची प्रस्तावना आहे. या दिग्गज साहित्यिक मंडळींचे सातत्याने त्यांना मार्गदर्शन लाभले.

त्यामुळे त्यांच्या कविता उत्तमोत्तम होत गेल्या. आईच्या निधनानंतर मातृप्रेमी मोरे यांनी आईवर २०० ते ३०० कविता लिहिल्या आहेत. याशिवाय त्यांच्या साहित्यसंपदेत २२ कविता संग्रह, ३ कथासंग्रह आणि ५ ललित लेखनांचा समावेश आहे.

सामान्यांच्या आर्थिक अडचणी सोडविता याव्या यासाठी सहकारी बँक स्थापन करावी अशी वडिलांची इच्छा मोरे यांनी मूर्तीमंत स्वरूपात आणली आणि आपल्या आईच्या नावाने मनोरमा क्रेडिट को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना केली. या बँकेचे आता वटवृक्षात रूपांतर झाले असून या बँकेची उलाढाल हजार कोटींच्या घरात गेली आहे.

लक्ष्मीची पूजा करीत असताना सरस्वतीलाही अधिष्ठान देण्यासाठी त्यांनी मनोरमा साहित्य मंडळीची स्थापना केली. २००२ ला घेतलेले शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे साहित्य संमेलन खूप गाजले आणि याला भरघोस प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत ११ साहित्य संमेलने घेण्यात आली असून ही सर्व राज्यच नाही तर देशव्यापी झाली आहे. मनोरमा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीचे क्षण त्यांच्या तर मनाला भारावून टाकतात.

या साहित्य संमेलनातून प्रचलित व नवोदित कवी व लेखकांना सन्मानित करून सामान्यांच्या घरापर्यंत साहित्य ते पोहोचवीत आहेत. मनोरमा कवितासंग्रह हे पुस्तक वडोदरा विद्यापीठ येथे अभ्यासाला घेतलेले आहे. हा सर्व प्रवास ते नीती मूल्ये आणि माणुसकीच्या मार्गावरून करीत आहेत.

पर्यटन आणि निसर्ग हा सुद्धा त्यांच्या आवडीचा विषय आहे. तीस एकर जमिनीवर पंधरा हजार केशर व हापूस आंब्याची लागवड केली आहे.विविध देशांची वारी करून तेथील साहित्य व संस्कृती याचे ते अवलोकन करतात व त्याचा साहित्यात कसा समावेश करता येईल यासाठी प्रयत्नरत असतात. या संपूर्ण प्रवासामध्ये त्यांच्या पत्नी शोभा मोरे आणि त्यांचे कुटुंब त्यांना सर्व परीने मदत करीत आहेत

मनोरमा अर्बन को-ऑपरेटिव बँक, मनोरमा सोशल फाउंडेशन, मसाप मनोरमा शाखा, मनोरमा साहित्य मंडळीचे अध्यक्ष असलेले श्रीकांत मोरे यांनी अर्थकारण आणि साहित्य संस्कृती या दोन टोकांचा दुर्लभ मेळ दिसून येतो तो त्यांच्या सत्य, सुंदर सर्वथा अशा आजन्म ध्यासामुळे. आणि हा त्यांचा ध्यास आणि चैतन्याचा झरा अखंड प्रवाहित राहो यासाठी आमच्या अनेक अनेक शुभेच्छा.

श्रीकांत मोरे संपर्क क्रमांक
7020600024

सुटलेलं पोट कमी करण्याचा रामबाण उपाय सापडला!

वाढलेले वजन आणि विशेषतः पोटावर वाढलेली चरबी ही आजच्या काळात अनेकांसाठी चिंतेची बाब आहे. तासनतास जिममध्ये घाम गाळून किंवा कडक डाएट करूनही अनेकदा पोटाचा घेरा कमी होत नाही.

मात्र आयुर्वेदानुसार आपल्या स्वयंपाकघरातील काही असे नैसर्गिक घटक आहेत, जे मेटाबॉलिझम वाढवून रात्री झोपेतही चरबी जाळण्यास मदत करतात.

रात्रीच्या वेळी आपले शरीर पूर्णपणे विश्रांतीच्या अवस्थेत असते, अशा वेळी जर आपण योग्य नैसर्गिक पेयाचे सेवन केले तर शरीरातील मेटाबॉलिझम सक्रिय राहून फॅट बर्निंग प्रक्रिया रात्रभर सुरू राहते. हे पेय केवळ पोटाची चरबी कमी करत नाही. तर रक्ताभिसरण सुधारण्यास आणि पचनसंस्थेला बळकटी देण्यासही मदत करते.

दिवसा धावपळीमुळे शरीराला जी ऊर्जा मिळते, त्याउलट रात्री हे पेय शरीराला अंतर्गत स्वच्छता करण्यास प्रवृत्त करते, ज्यामुळे पोटाचा फुगीरपणा कमी होऊन शरीर हलके जाणवू लागते.

आवश्यक साहित्य आणि त्याचे फायदे

आले : आल्यामध्ये थर्मोजेनिक गुणधर्म असतात. ते शरीराचे तापमान किंचित वाढवून कॅलरी जाळण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात.

लिंबू : व्हिटॅमिन सी आणि अँटी-ऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले लिंबू शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत करते.

जिरे किंवा धने पूड: जिरे शरीरातील फॅट सेल्स तोडण्यास अत्यंत प्रभावी ठरतात आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात.

पाणी: १ मोठा ग्लास.

कृती

एका पातेल्यात एक मोठा ग्लास पाणी गरम करायला ठेवा.

त्यात थोडे किसलेले आले आणि अर्धा चमचा जिरे (किंवा धने पूड) टाका.

हे पाणी किमान ५ मिनिटे चांगले उकळून घ्या, जेणेकरून सर्व घटकांचा अर्क पाण्यात उतरेल.

पाणी कोमट झाल्यावर गाळून घ्या आणि त्यात अर्ध्या लिंबाचा रस मिसळा.

फायदे काय?

हे पेय रात्री झोपण्यापूर्वी साधारण ३० ते ४० मिनिटे आधी कोमट असतानाच प्यावे. हे प्यायल्यानंतर काहीही खाऊ नये. हे पेय रात्री मंदावलेली पचनसंस्था सक्रिय करते, ज्यामुळे सकाळी पोट साफ होण्यास मदत होते. तसेच शरीरातील साठलेली घाण बाहेर पडल्यामुळे पोटाचा फुगीरपणा कमी होतो. तसेच जिऱ्यामध्ये शरीरात इन्सुलिनचे प्रमाण संतुलित राहते, ज्यामुळे शरीरात नवीन चरबी साठत नाही. ■ ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

कॉपी मुक्तीची शपथ

शपथेला आजकाल समाजात
राहिली नाही किंमत
गीतेवर हाथ
ठेवूनही खोटं
बोलण्याची वाढलीय
ना हिंमत ..!

उक्ति व कृतीत परिक्षेत
दिसून येते विसंगती म्हणून
शपथेचा प्रभाव सांगा
दिसुन येईल
कसा व किती ?..

नियमांचे व्हावे कडक पालन
करु नये कुणाचाही मुलाहिजा
दोषींना द्याल फास्ट सजा
तरच परिणाम
दिसेल ना राजा..!

हंगामा ओटीटीची लोकप्रिय अँथॉलॉजी हसरतें तिसऱ्या सीझनसह सह पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला



मुंबई, ३ फेब्रुवारी : भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपल्या लोकप्रिय अँथॉलॉजी हसरतें चा तिसरा सीझन जाहीर केला आहे. महिलांच्या मनातील भावना, न बोललेल्या इच्छा आणि शांत बंडखोरी यांचा शोध घेणाऱ्या या मालिकेचा नवा अध्याय प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या दोन सीझनच्या मोठ्या यशानंतर, सीझन ३ मध्ये गुदमरून टाकणारी वैवाहिक नाती, कठोर परंपरा, राजकीय डावपेच आणि भावनिक दुर्लक्षामुळे घडलेल्या आयुष्यांच्या कथा अधिक खोलवर मांडल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत हसरतें ने सहसा न सांगितल्या जाणाऱ्या कथा मांडत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महिलांच्या इच्छा, ओळख आणि समाजाच्या बंधनांमधील संघर्ष प्रामाणिकपणे दाखवल्यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडली आहे. सीझन ३ मध्ये थ्रिलर, गुन्हेगारी आणि ड्रामा यांचा संगम असलेले सहा प्रभावी भाग आहेत. प्रत्येक कथा धाडसी, भावनिक आणि माणुसकीने भरलेली आहे. हसरतें सीझन ३ चे पहिले दोन भाग २२ जानेवारी रोजी प्रदर्शित झाले, त्यानंतर २७ जानेवारी रोजी आणखी दोन भाग आले, आणि शेवटचे दोन भाग ४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होतील.

हसरतें सीझन ३ मध्ये सहा प्रभावी कथा आहेत, ज्या महिलांच्या शांततेतून, संघर्षातून आणि आत्मजागृतीच्या प्रवासातून उलगडतात. हल्ला बोल या कथेत ज्योतीची गोष्ट आहे. ती छळ सहन करणारी पत्नी असून, तिला बाहुली म्हणून राजकारणात ढकलले जाते. हळूहळू ती स्वतःचा आवाज शोधते आणि नियंत्रणाविरुद्ध उभी राहते. ब्युटी पार्लर मध्ये लखनौची सलमा ही गरीब परिस्थिती, मातृत्व आणि दुर्लक्षित वैवाहिक नातं सांभाळताना दिसते. सुरक्षिततेसाठी तिला आपल्या सन्मानाची किती किंमत मोजावी लागते, याचा ती सामना करते. मिडनाईट ब्राइड ही कथा अनन्याची आहे. ती एक तरुण विधवा असून हवेलीतील कठोर नियमांमध्ये अडकलेली आहे. कला आणि एका अनपेक्षित व्यक्तीमुळे तिच्या दडलेल्या इच्छा आणि भावना समोर येतात. दो अनजाने मध्ये दोन अनोळखी व्यक्ती एकत्र येतात एक छळ सहन करणारी पत्नी आणि खोट्या आरोपांमध्ये अडकलेला एक पुरुष. दंगलीने ग्रासलेल्या एका रात्रीत त्यांना थोडीशी आशा मिळते. गुपचूप रसोई मध्ये दुर्लक्षित अन्नलेखिका निर्मला, स्वयंपाकघराला बंडखोरीचं स्थान बनवते. तिथे तिला स्वतःची ओळखमिळते, पण त्याच वेळी धोक्यालाही सामोरं जावं लागते. शेवटी नया किरायेदार ही कथा स्मिताची आहे. पतीच्या अचानक गायब झाल्यानंतर तिच्या मनातील शांत ओढ दाखवली आहे. सततच्या देखरेखीखाली जगणाऱ्या तिच्या आयुष्यात एका तरुण संगीतकाराचं आगमन तिचं आयुष्य बदलून टाकते.

आपल्या भूमिकेबद्दल आणि कथेबद्दल बोलताना मोनालिसा म्हणते, गुपचूप रसोई ही कथा आवाज न करता स्वतःसाठी उभं राहण्याबद्दल आहे. महिलांविषयी, त्यांच्या आत्मसन्मानाविषयी आणि स्वतःला प्राधान्य देण्याच्या महत्त्वाबद्दल बोलणाऱ्या भूमिका करायला मला खूप आवडतात. दडपशाही आणि अपमानाला सामोरे जाण्यापासून ते स्वयंपाकाच्या आवडीतून स्वतःचे आत्म-सन्मानशोधण्यापर्यंतचा निर्मलाचा प्रवास अनेक स्त्रियांना आपलासा वाटेल. ही कथा स्वतःला निवडण्याची, अनपेक्षित ठिकाणी ताकद शोधण्याची आणि स्वातंत्र्य आपल्या आतूनच सुरू होते याची जाणीव करून देणारी आहे.

नया किरायेदार मध्ये स्मिताची भूमिका साकारणारी चाहत पांडे म्हणते, स्मिता भावनिकदृष्ट्या एकटी पडलेली आहे. तिला टीकेचा भार सहन करावा लागतो आणि ती असे आयुष्य जगत आहे जिथे तिच्या गरजा बऱ्याच काळापासून दाबल्या गेल्या आहेत. इच्छा आणि कर्तव्य, भीती आणि स्वातंत्र्य यांच्यातला तिचा अंतर्गत संघर्ष मला खूप भावला. तिचा प्रवास फक्त बंडखोरीचा नाही, तर अनेक वर्षांच्या दुर्लक्षानंतर स्वतःचं अस्तित्व आणि हक्क पुन्हा मिळवण्याचा आहे. प्रेक्षकांनी तिची असुरक्षितता अनुभवावी आणि शेवटी स्वतःला निवडण्यासाठी किती धैर्य लागतं, हे समजून घ्यावं, अशी माझी अपेक्षा आहे.

नया किरायेदार मध्ये समर्थची भूमिका करणारा सुबीर राणा म्हणतो,समर्थ स्मिताच्या आयुष्यात येतो आणि तिचं संपूर्ण जगच बदलून टाकतो. अनेक वर्षांपासून ती टाळत असलेल्या भावना तो बाहेर आणतो. ही कथा न बोललेल्या इच्छा, समाजाकडून होणारा न्यायनिवाडा आणि वैयक्तिक आनंद व सामाजिक अपेक्षा यामधील सततच्या संघर्षावर आधारित आहे. ही कथा अनेक थरांची, भावनिक आणि माणुसकीने भरलेली आहे.

हसरतें सीझन ३ चे सर्व भाग आता हंगामा ओटीटी आणि भागीदार प्लॅटफॉर्मवर स्ट्रीमिंगसाठी उपलब्ध आहेत. २२ जानेवारी आणि ४ फेब्रुवारी रोजी नवे भाग प्रदर्शित होतील.

हृदयाची धडधड कधी कधी धोकादायक नसते, पण लक्ष देणे गरजेचे आहे

हृदयाचे काहीतरी बिघडले आहे असे वाटणे खूप भीतीदायक ठरू शकते. विशेषतः जेव्हा हृदयाची धडधड अचानक वेगळी, खूप जलद किंवा अनियमित वाटू लागते, तेव्हा अनेकांना चिंता वाटते आणि काही गंभीर तर नाही ना, अशी भीती निर्माण होते. मात्र दिलासादायक गोष्ट म्हणजे हृदयाची धडधड (हार्ट पॅल्पिटेशन) ही खूप सामान्य समस्या आहे आणि बहुतांश वेळा ती धोकादायक नसते. तरीही तिच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करू नये. क्वचित प्रसंगी ही धडधड एट्रियल फायब्रिलेशन (हृदयाची अनियमित धडधड) किंवा वेंट्रिक्युलर टॅकीकार्डिया (हृदय खूप वेगाने धडधडणे) यांसारख्या गंभीर आजारांचे लक्षण असू शकते. त्यामुळे हृदयाची धडधड कधी गंभीर ठरू शकते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून योग्य वेळी डॉक्टरांचा सल्ला घेऊन योग्य उपचार करता येतील.

हृदयाची धडधड जास्त जाणवणे (हार्ट पॅल्पिटेशन) म्हणजे काय ?

तुम्हाला कधी असे वाटले आहे का की हृदयाचा एखादा ठोका चुकला, ते फडफडत आहे किंवा अचानक खूप वेगाने धडधडू लागले आहे ? अशा प्रकारच्या जाणिवांना हार्ट पॅल्पिटेशन (हृदयाची धडधड असामान्यपणे जाणवणे) असे म्हणतात. यामध्ये वेगवेगळे अनुभव येऊ शकतात, ज्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो:

हृदय नेहमीपेक्षा खूप वेगाने धडधडत असल्याची जाणीव

छातीत जोरात धडधड किंवा ठोके जाणवणे

हृदयाची धडधड अनियमित होणे किंवा ठोका चुकल्यासारखे वाटणे

सोप्या शब्दांत सांगायचे तर, जेव्हा तुम्हाला हृदयाची धडधड नेहमीपेक्षा जास्त जाणवू लागते, तेव्हा त्याला हृदयाची धडधड ('पॅल्पिटेशन') असे म्हणतात. काही लोकांना ही जाणीव छातीतच नव्हे, तर घशात किंवा मानेतही जाणवू शकते.

सामान्य कारणे

जर तुम्हाला वाटत असेल की हृदयाची धडधड वेगळी वाटणे म्हणजे हृदयाचा आजार आहे, तर हे जाणून तुम्हाला दिलासा मिळेल की बहुतेक वेळा यामागे गंभीर हृदयविकार नसतो. यामागची काही सामान्य कारणे अशी असू शकतात:

शारीरिक व्यायाम

ताणतणाव किंवा चिंता

मद्यपान

कॅफिनसारखे उत्तेजक पदार्थ (चहा, कॉफी)

निकोटीन सोडताना होणारे बदल

गर्भधारणेदरम्यान होणारे हार्मोन्समधील बदल

रक्तातील साखरेची पातळी कमी होणे

घरी हृदयाची धडधड कशी कमी करावी

हृदयाशी संबंधित नसलेल्या कारणांमुळे होणारी धडधड अनेकदा साध्या जीवनशैलीत बदल करून कमी केली जाऊ शकते.

जर ताण किंवा चिंता कारणीभूत असेल, तर खोल श्वास घेणे, ध्यान (मेडिटेशन) किंवा योगासारख्या रिलॅक्सेशन पद्धती उपयुक्त ठरतात आणि हृदयाची धडधड शांत करण्यास मदत करतात. कॅफिन किंवा तंबाखूमुळे धडधड होत असल्यास, त्यांचे सेवन कमी केल्याने फरक पडू शकतो. तसेच, तुम्ही कोणती औषधे घेत असाल तर डॉक्टरांना नक्की सांगा, कारण काही औषधांमुळेही पॅल्पिटेशन होऊ शकते.

पुरेसे पाणी पिणे आणि योग्य आहार घेणे खूप महत्त्वाचे आहे. शरीरात पाणी कमी झाल्यास किंवा पोटॅशियमची पातळी कमी असल्यास हृदयाची धडधड होऊ शकते. तसेच, जास्त प्रमाणात प्रक्रिया केलेली साखर किंवा कार्बोहायड्रेट असलेले पदार्थ खाल्ल्यास, विशेषतः ज्यांना रक्तातील साखर कमी होण्याची समस्या आहे अशा लोकांमध्ये, ही लक्षणे वाढू शकतात.

डॉक्टरांकडे कधी जावे

जवळजवळ प्रत्येकालाच आयुष्यात कधीतरी हृदयाची धडधड जाणवते, आणि बहुतांश वेळा ही धडधड थोड्या वेळापुरती असते आणि धोकादायक नसते. पण कधी कधी ही धडधड शरीरातील एखाद्या समस्येचे लक्षणही असू शकते.

जर हृदयाची धडधड काही सेकंदांपेक्षा जास्त वेळ टिकत असेल, वारंवार होत असेल किंवा हळूहळू तीव्र होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. तुम्ही पूर्णपणे निरोगी असलात तरी धडधड किती वेळा होते आणि किती वेळ टिकते याकडे लक्ष ठेवणे योग्य ठरते.

काही प्रकरणांमध्ये हृदयाची धडधड एट्रियल फायब्रिलेशन, वेंट्रिक्युलर टॅकिकार्डिया किंवा अगदी हृदय निकामी होण्यासारख्या गंभीर हृदयाच्या लयबाधित आजारांशी संबंधित असू शकते.

घाबरू नका, पण लक्षणांकडे दुर्लक्षही करू नका बहुतांश वेळा हृदयाची धडधड उचकीइतकीच सामान्य असते आणि ती गंभीर नसते. तुम्ही निरोगी असाल आणि ही समस्या क्वचितच होत असेल, तर घाबरण्याची गरज नाही.

पण जर धडधड सतत जास्त होत असेल, तर डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करणे आवश्यक आहे. जर यासोबत चक्कर येणे, कमजोरी, छातीत त्रास किंवा श्वास घेण्यात अडचण अशी लक्षणे दिसत असतील, तर ही गंभीर आजाराची चिन्हे असू शकतात, त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करू नये. शंका असल्यास हृदयतज्ज्ञ (कार्डियोलॉजिस्ट) यांचा सल्ला घेणे आरामदायकही ठरते आणि वेळेवर योग्य उपचार मिळवता येतो.

एच्हीबीआरएच कार्डियोलॉजी विभागातील सेवा

उपलब्ध सुविधा:

इंटरव्हेन्शनल कार्डियोलॉजी: अँजिओप्लास्टी, स्टेंट बसवणे, पेसमेकर बसवणे आणि बलून व्हॅल्व्ह्युलोप्लास्टी.

इलेक्ट्रोफिजिओलॉजी आणि रिथमिया उपचार: हृदयाची धडधड अनियमित होण्याचे निदान आणि उपचार, त्यामध्ये अब्लेशन प्रक्रियांचा समावेश आहे.

हृदयविकार क्लिनिक: हृदयविकाराच्या रुग्णांसाठी प्रगत उपचार योजना, ज्यात औषधोपचार आणि डिव्हाइस थेरपीचा समावेश आहे.

पेडियाट्रिक कार्डियोलॉजी: मुलांमधील जन्मजात हृदयविकारांचे निदान आणि उपचार.

प्रतिबंधात्मक कार्डियोलॉजी: जीवनशैलीत बदल, आहारविषयक सल्ला आणि हृदयविकाराचा धोका तपासणे.

होल्टर मॉनिटरिंग: २४ ते ४८ तास सतत ईसीजी तपासणी.

स्ट्रेस टेस्ट (टीएमटी): ताणाच्या अवस्थेत हृदयाचे कार्य तपासणे.

पेसमेकर इम्प्लांटेशन (बेसिक): हृदयाचे ठोके मंद असलेल्या रुग्णांसाठी सिंगल-चेंबर पेसमेकर बसवणे.

हा लेख डॉ. चेतन राठी, इलेक्ट्रोफिजिओलॉजी तज्ज्ञ, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सवांगी यांनी लिहिला आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा: ९२०९०५४४७७

कोटक म्युच्युअल फंडने गुंतवणूकदारांसाठी भारताच्या वाढीच्या इंजिनला चालना देण्यासाठी कोटक सर्व्हिसेस फंड सुरू केला आहे

मुंबई, ३ फेब्रुवारी : कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ने कोटक सर्व्हिसेस फंड या सेवा-आधारित्रीमवर आधारित ओपन-एंडेड्रिकिटी योजनेची घोषणा केली आहे. ही नवीन फंड ऑफर गुंतवणूकदारांना भारताच्या मुख्य वाढीच्या इंजिनमध्ये सेवा क्षेत्रात गुंतवणुकीची संधी देते. सेवा क्षेत्र देशाच्या ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड मध्ये ५५% योगदान देते आणि देशातील ३१.५% कामगारांना१ रोजगार देते.

ग्राहक सेवा, दूरसंचार, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स, वित्तीय सेवा, आयटी, ऊर्जा आणि तेल व वायू यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये जलद वाढ होत आहे. त्यामुळे भारताची सेवा अर्थव्यवस्था दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी* अनेक संरचनात्मक वाढीचे घटक उघड करत आहे.

निलेश शाह, व्यवस्थापकीय संचालक, कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड यांनी सांगितले: भारताची सेवा अर्थव्यवस्था संरचनात्मक बदलातून जात आहे. वाढती उत्पन्ने, डिजिटल स्वीकार आणि शहरीकरण यामुळे भारतीयांच्या उपभोग, व्यवहार आणि आवश्यक सेवांमध्ये प्रवेश करण्याच्या पद्धती बदलत आहेत. कोटक सर्व्हिसेस फंड द्वारे आम्ही अशा संधींना पकडणारे पोर्टफोलिओ तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्यामुळे गुंतवणूकदारांना दीर्घकालीन मूल्य मिळेल.

रोहित टंडन, कोटक सर्व्हिसेस फंडचे फंड मॅनेजर म्हणाले: सेवा-आधारित थीममध्ये उपभोग-आधारितआणि निर्यात-आधारितविभागांचा समावेश असल्यामुळे स्थिरता आणि वाढ दोन्ही मिळतात. आमच्या दृष्टीने, सेवा क्षेत्र हे भारताच्या बाजारपेठेत लवचिकता आणि विस्तारक्षमता यांचे सर्वात आकर्षक संयोजन आहे. कोटक सर्व्हिसेस फंडमध्ये आमचे पोर्टफोलिओ बांधणी अशा कंपन्यांकडे झुकलेले असेल ज्यांनी नफा टिकवून ठेवण्याची क्षमता दाखवली आहे, व्यवसाय मॉडेल्स सुधारले आहेत आणि भांडवल शिस्तबद्धपणे वापरले आहे. आमचा गुंतवणुकीवरील विश्वास असा आहे की अशा कंपन्यांची शिस्तबद्ध निवड गुंतवणूकदारांसाठी स्थिर आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीत रूपांतरित होऊ शकते.

कोटक सर्व्हिसेस फंड अशा काळात सुरू होत आहे जेव्हा भारतातील सेवा-आधारित उद्योग घरगुती, व्यवसाय आणि संस्थांच्या कार्यपद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहेत. ग्राहकांच्या अपेक्षा बदलत असताना आणि सेवा वितरणाचे मॉडेल्स अधिक प्रगत होत असताना, या क्षेत्रात अशा उद्योगांची जोरदार वाढ होत आहे जे विशेषीकरण, तंत्रज्ञान-सक्षमप्रक्रिया आणि कार्यक्षम शिस्त यांचा वापर करून प्रभावीपणे विस्तार करत आहेत.

एनएफओमध्ये किमान १,००० गुंतवणूक करता येईल आणि ऑफर कालावधीत त्यानंतर कोणतीही रक्कम गुंतवता येईल. ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे जे सेवा-आधारित व्यवसायांमध्ये गुंतवणूक केलेल्या विविधीकृत पोर्टफोलिओद्वारे दीर्घकालीन भांडवली वाढ शोधत आहेत, जसे की योजनेच्या उत्पादन उपयुक्तता प्रकटीकरणांमध्ये नमूद केले आहे.

मदर्स पेट किंडरगार्टनतर्फे अभ्यासक्रम २.०चे अनावरण

नागपूर, ३ फेब्रुवारी : प्रारंभिक बालशिक्षण क्षेत्रातील विश्वासार्ह नाव असलेल्या मदर्स पेट किंडरगार्टनने आपल्या नव्या अभ्यासक्रम २.०च्या शुभारंभाची घोषणा केली. हा अभ्यासक्रम आयोजित विशेष पालक सहभाग कार्यक्रमातून सादर केला जाणार असून, हा उपक्रम नागपूरमधील सदर, वर्धमान नगर, खामला चौक आणि अमरावती मार्ग बायपास येथील सर्व चार संकुलांमध्ये एकाच वेळी पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश पालक आणि शिक्षक यांना बालकांच्या शिक्षणप्रवासाशी अधिक जवळून जोडणे हा आहे. कार्यक्रमादरम्यान सुस्पष्ट सादरीकरणे आणि अनुभवाधारित उपक्रम क्षेत्रांच्या माध्यमातून शाळेच्या विकसित होत असलेल्या अभ्यासक्रमाची संकल्पना तसेच प्रारंभिक वयात भक्कमशैक्षणिक पाया कसा घातला जातो, याची सविस्तर माहिती पालकांना देण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम बालकांच्या जीवनातील सर्वाधिक महत्त्वाच्या आणि घडणीच्या टप्प्याला केंद्रस्थानी ठेवून रचण्यात आला आहे.

अभ्यासक्रम २.०चे अनावरण संस्थेच्या नव्या ओळखी प्रारंभिक वर्षे. निर्णायक वर्षे. या संकल्पनेच्या अनुषंगाने करण्यात येत आहे. अलीकडेच संकुलविस्तार पूर्ण झाल्यानंतर, हा अद्ययावत अभ्यासक्रम प्रारंभिक बालशिक्षण क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित करण्याच्या मदर्स पेट किंडरगार्टनच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे द्योतक आहे.

हा अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त प्रारंभिक शिक्षण तत्त्वज्ञान आणि सर्वोत्तम शैक्षणिक पद्धतींवर आधारित असून, भारतीय सामाजिक व शैक्षणिक संदर्भानुसार त्याची मांडणी करण्यात आली आहे. खेळाधारित आणि अनुभवकेंद्रित शिक्षणावर विशेष भर देण्यात आला असून, यामुळे बालकांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि भावनिक समतोल विकसित होण्यास मदत होते.

अभ्यासक्रम २.० अंतर्गत अनेक महत्त्वपूर्ण नव्या उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्यक्ष कृतीतून शोध आणि समस्या निराकरणाला चालना देणारे निर्मिती क्षेत्र, सर्जनशील अभिव्यक्तीस प्रोत्साहन देणारी रेज्जिओ प्रेरित सर्जनशील कार्यशाळा, तसेच हेतुपूर्ण खेळाच्या माध्यमातून बौद्धिक, शारीरिक आणि सामाजिक विकास घडविणारा सहा वीट उपक्रम यांचा समावेश आहे. यासोबतच बालकांच्या सामाजिक व भावनिक विकासासाठी आनंदी बालकांच्या सात सवयी आणि बालस्वभाव विकास उपक्रम राबविले जाणार आहेत. भाषा कौशल्य आणि कथाकथनाची आवड निर्माण करण्यासाठी कथांचा विश्व ही विशेष संकल्पना अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे.

सोनी सबचा गणेश कार्तिकेय १०० हृदयस्पर्शी एपिसोड्स करतो

मुंबई, ३ फेब्रुवारी : सोनी सबची पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की -गणेश कार्तिकेय भगवान गणेश (निर्णय समाधिया) आणि शिव परिवाराच्या कथा प्रेक्षकांना सतत मोहून टाकत आहे. आध्यात्मिक वैभवाला उबदार, आपुलकीच्या कौटुंबिक क्षणांशी जोडत हा शो सुंदरपणे दाखवतो की दिव्य परिवार प्रेम, जबाबदारी आणि संघर्षाचा अनुभव कसा घेतो भगवान शिव (अविनेशरेखी) आणि देवी पार्वती (श्रेनु पारिख) यांच्या दिव्य गृहात.

शोने १०० एपिसोड्स टप्पा गाठल्याच्या या महत्त्वपूर्ण क्षणी, संपूर्ण कलाकारवर्ग कृतज्ञतेने या अर्थपूर्ण यशाचा उत्सव साजरा करत आहे. शोची सध्याची कथा, जी भगवान गणेश आणि पवित्र अष्टविनायक यात्रेच्या गाथांचा मागोवा घेते, प्रेक्षकांशी खोलवर जोडली गेली आहे. ही कथा आध्यात्मिक महत्त्व आणि भावनिक कथाकथनाचा प्रभावी संगम सादर करते. ही उपलब्धी श्रद्धा, मूल्ये आणि भावनिक सत्याशी निगडित कथांवरील प्रेक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रेमाचे प्रतिबिंब आहे.

श्रेनु पारिख, जी देवी पार्वतीची भूमिका साकारत आहे, सांगते देवी पार्वतीचा प्रवास अत्यंत भावनिक आहेती एक आई आहे, मार्गदर्शक आहे आणि शक्तीचा स्रोत आहे. दिव्य कथाकथनातून कौटुंबिक नात्यांना अधोरेखित करणाऱ्या शोचा भाग होणे माझ्यासाठी अत्यंत समाधानकारक ठरले आहे. १०० एपिसोड्स हा टप्पा जितका आमच्या टीमचा आहे तितकाच आमच्या प्रेक्षकांचा आहे, कारण त्यांची श्रद्धा आणि आपुलकी आम्हाला दररोज प्रेरणा देते.

अविनेश रेखी, जो भगवान शिवाची भूमिका साकारत आहे, पुढे म्हणतो १०० एपिसोड्स टप्पा ही फक्त एक संख्या नाही; ती प्रेक्षक आमच्यावर ठेवत असलेल्या विश्वासाची आठवण करून देते. गणेश कार्तिकेय मूल्ये, नाती आणि अंतर्गत प्रवासांवर केंद्रित आहे. भगवान शिव म्हणून, गणेश आणि कार्तिकेय दोघांना त्यांच्या मार्गावर मार्गदर्शन करणे माझ्यासाठी एक गहन अनुभव ठरला आहे. १०० एपिसोड्स करणे प्रेक्षकांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाला अधिक दृढ करते, आणि आम्ही आशा करतो की या कथा प्रामाणिकपणे आणि मनापासून पुढेही सांगत राहू.

निर्णय समाधिया, जो भगवान गणेशाची भूमिका साकारत आहे, म्हणतो भगवान गणेशाचा प्रवास शिकणे, वाढणे आणि भावनांना समजून घेण्याचा राहिला आहे, आणि मला भाग्यवान वाटते की प्रेक्षकांनी मला इतक्या आपुलकीने स्वीकारले आहे. १०० एपिसोड्स करणे अविश्वसनीय वाटते, आणि ही सफर इतकी संस्मरणीय बनवल्याबद्दल मी संपूर्ण टीमचा आभारी आहे मला आमचे प्रेक्षक खूप प्रिय आहेत, कृपया तुमचे प्रेम आणि आपुलकी अशीच आमच्यावर वर्षाव करत राहा. मला ही संधी दिल्याबद्दल मी बाप्पाचा मनःपूर्वक आभारी आहे.

बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६

कल्याण बाजार पत्थर फोड एकच	मुंबई बाजार पत्थर फोड एकच
२ ५ ८ ९	२ ३ ६ ७
१३८ १५९ १२५ १२६	१२९ १५७ १५० १६०
३४५ २४९ २७९ २७०	३४५ २३८ २६८ ३४०
२०० ३६६ ४६८ ३६०	६७९ ३०० ७९० ८९०
जोडी	जोडी
२१ - ५१ - ८० - ९०	२१ - ३१ - ६८ - ७८
२४ - ५४ - ८६ - ९६	२४ - ३४ - ६९ - ७९
२७ - ५७ - ८३ - ९३	२० - ३० - ६५ - ७५

जबरदस्त पास होणारे चान्सेस ४ फेब्रुवारी २०२६

बुधवार दि. ४ फेब्रुवारी २०२६

सर्व बाजार साठी

३१ - ४१ - ५६ - ७६
३० - ४० - ५८ - ७८
३९ - ४९ - ५२ - ७२
---
१३९ - १४८ - १५९ - २६९
२५६ - ३४६ - २६७ - ४५८
६८९ - ५९९ - ७८० - १८८

सर्व बाजारासाठी

सोम. ते बुध. ओपन डे			सोम. ते बुध. ओपन नाईट		
३७०	४७०	६७०	२३४	४९९	१५९
४६०	० ३८०	१ ५८०	३ ३७९	९ ५७०	२ २५८ ५
५५०	५६०	४९०	४७८	६६०	३५७

सोम. ते बुध. क्लोज डे			सोम. ते बुध. क्लोज नाईट		
११०	४००	१६९	३४६	१६०	२९९
२००	२ ३३८	४ २६८	६ ४९०	३ ३४०	७ ३८९ ०
३९०	५९०	३६७	५८०	२५०	४७९

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ २ ३ ९ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

राशीभविष्य

मेष: आज कोणतीही गुंतवणूक करताना तुमच्या बजेटचे भान ठेवा. या राशीत जन्मलेल्या आणि नोकरी करणाजयांना प्रगती होण्याची शक्यता आहे. कुटुंबासमोर महत्वाच्या कामात मत व्यक्त करण्याची तुम्हाला भरपूर संधी मिळेल.

वृषभ: तुमच्या योजना यशस्वी होतील. उत्पन्नाच्या संधी निर्माण होतील. तुमच्या मुलांच्या बाबतीत तुम्हाला सकारात्मक परिणाम दिसतील. कौटुंबिक जीवन चांगले राहील. तुमच्या कामाचा ताण वाढू शकतो.

मिथुन : आज तुम्हाला एक चांगली बातमी मिळेल, ज्यामुळे तुम्ही दिवसभर हसत राहाल. कामावर बढतीची तुमची वाट पाहणे संपेल. तुमच्या नवीन पदावर कामाचा ताण वाढेल. कुटुंबासोबत वेळ मर्यादित राहील .

कर्क : एखाद्या महत्त्वाच्या कामात तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला सहकार्य मिळेल. नातेवाईक तुमच्या घरी येऊ शकतात आणि तुम्हाला त्यांना भेटून आनंद होईल. सहकारी मदत करतील.

सिंह : आज तुमची आर्थिक परिस्थिती चांगली होईल. तुमच्या कामात तुम्हाला उत्तम परिणाम दिसतील. परिस्थिती अनुकूल असेल. तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित कराल.

कन्या : आज, तुमच्या वैयक्तिक आयुष्यातील चालू समस्या सोडवण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. तुमच्या कौटुंबिक जीवनात आनंद राहील. तुमच्या कार्यक्षेत्रात लक्षणीय यश मिळेल.

तुळ : मालमत्तेच्या बाबतीत काही समस्या उद्भवू शकतात, परंतु न्यायालयात तुम्हाला यश मिळेल. तुम्ही काम आणि घर यांच्यात चांगले संतुलन राखाल. तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

वृश्चिक: नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. आज तुमची आर्थिक परिस्थिती चांगली असेल. तुम्ही तुमच्या कुटुंबासह सुंदर ठिकाणी प्रवास करू शकता.

धनु : तुमच्या मुलांशी संबंधित कोणत्याही समस्या सोडवल्या जातील. आज, सहकाजयांसोबत तुमचे संबंध चांगले असतील. आज तुम्ही एक नवीन प्रकल्प सुरू कराल, जो यशस्वी होण्याची शक्यता आहे.

मकर : आज तुमचे प्रयत्न यशस्वी होतील. अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामामुळे चांगली बढती मिळू शकते. तुम्ही कामात खूप व्यस्त असाल .

कुंभ : आज तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल. काम कितीही कठीण असले तरी, तुम्ही तुमची एकाग्रता कायम ठेवली पाहिजे. आज, तुम्हाला कामावर एक नवीन प्रकल्प मिळेल.

मीन : विविध स्रोतांकडून आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुमच्या नोकरीत यश मिळण्याची शक्यता आहे. तुमचा पगार वाढू शकतो.

शब्दकोडे क्रमांक २३४४



आडवे शब्द :-

१) जलाभास
४) कलावंत
७) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
१०) संताप
१२) जेवणातील दोन पदार्थ
१४) वरदक्षिणा
१५) चांगले लक्षण असलेला
१७) थंड
१८) गव्हाचे पीठ
१९) अमान्य, नामंजूर
२०) भेग, चीर
२१) कुराणातील वचने
२२) चंद्र
२३) आगबोट
२६) सोने, सुवर्ण
२९) जंगली फुलांची माळ
३२) गडीमाणसे
३४) शरीराची थरथर
३६) लाटण्याचा जोडीदार
३८) फळाचे टरफल
३९) कैफी, नशा आणणारा
४१) खटका, वेदना
४२) कावळा
४३) मुख
४५) हाताचा तळवा
४७) अवस्था, स्थिती
४८) गवंडी
५०) तात्पर्य
५१) मुलांच्या भाषेत देव
५२) थोडेफार
५४) ईश्वरी शक्ती, पार्वती
५६) शंकराचे वाहन असलेल्या बैलाचे नाव
५७) रात्री प्रकाशणारा किटक
५८) मुलगी
५९) गुणांची चाहा करणारा
६१) काळ्या रंगाची
६२) निवासस्थान
६३) भारवाहक
६४) अथवा, किंवा
६५) विविध, अनेक

उभे शब्द :-

२) लोकांचा घेराव
३) विश्व, दुनिया
५) पेरणी, तमाशातील शृंगारिक गीत
६) मोटार (इं)
७) तोफवाहक शस्त्र
८) रजनी
९) जीवनमान, राहणीचा दर्जा
११) एक झाडावर दुसरे रोप रुजविण्याची क्रिया
१३) बोजा, वजन
१४) थोडीशी दलाली घेऊन मालाची ने-आण करणारा दलाल
१५) आलेली चांगली संधी
१६) रक्त, रुधिर
१८) आवाजांचा गोंधळ
१९) वायु
२०) दालचिनीचे झाड
२४) चलनवलन
२५) झकास, मस्त
२७) अलमारी
२८) मांडी, आंकडा
२९) लग्न समारंभातील नवरदेवाची आई
३०) पोशिंदा, धनी
३१) सर, हार
३२) कागदी चलन
३३) रसपूर्ण
३५) छोटासा
३६) उदर
३७) भेग बुजविणारी वा भेग वाढविणारी खुंटी
४०) विजयादशमी आणि दीपावली
४१) कलमापासून तयार झालेले (फळ)
४२) समईतील कापसाची वळी
४४) पाताळात भोगाव्या लागणा-या वेदना
४५) कपाटातील खण
४६) नशीब,दैव (हिं.)
४७) फिरता पहारा
४९) हिशेबातील खर्चाच्या विरुद्धची बाजू
५१) फुंकून वाजविण्याचे एक वाद्य
५३) जामीनकी
५४) सध्या
५५) वेदना
५६) इंद्राची बाग, पुत्र
५९) सोवळ्याचे रेशमी वस्त्र
६०) गुलामी

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



जिल्हा परिषद शिक्षकांच्या वाऱ्या ; विद्यार्थी वाऱ्यावर

ग्रामीण भागातील शैक्षणिक नुकसान न भरुन

वार्तापत्र
मारोती पाटणकर

चुरणी, (दि. 3) - ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षण व्यवस्थेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेषत: आदिवासी व दुर्गम भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षक वेळेवर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. सकाळी शाळा सुरू होण्याच्या वेळेला शिक्षक उशिरा येणे, तर दुपारच्या सत्रात ठरलेल्या वेळेपूर्वीच शाळा सोडून जाणे, असे प्रकार सर्रास घडत असल्याचे चित्र आहे. या अपडाऊनच्या वाऱ्यामूळे आदिवासी विद्यार्थी वाऱ्यावर सोडल्यागत झाले आहे. या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षणाचा दर्जा दिवसेंदिवस खालावत चालला आहे.

ग्रामीण व आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळा या गरीब, वंचित व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा एकमेव आधार आहेत. मात्र याच शाळांमध्ये शिक्षकांची शिस्त ढासळलेली दिसून येत आहे. शिक्षक वेळेवर उपस्थित नसल्यामुळे अभ्यासक्रम अपूर्ण राहतो, परीक्षेच्या तयारीत अडथळे निर्माण होतात आणि त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. आधीच आर्थिक अडचणी, पालकांचे अशिक्षण आणि मर्यादित साधनसंपत्ती अशा समस्यांना सामोरे जाणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये त्यामुळे निराशा पसरत आहे. 'शाळेत आलो तरी शिक्षक नसतात' अशी भावना निर्माण झाल्याने शाळाबाह्य मुलांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिक व पालकांनी या प्रकाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. आमची मुले शिकून पुढे जावीत म्हणून शाळेत पाठवतो, मात्र शिक्षकच वेळेवर येत नसतील तर शिक्षण कसे होणार, असा सवाल पालक विचारत आहेत. शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे अनेकदा एका शिक्षकावर अनेक वर्गांचा भार येतो, त्यामुळे गुणवत्तापूर्ण अध्यापन करणे कठीण बनते.

शिक्षण विभागाकडून बायोमेट्रिक हजेरी, अचानक तपासण्या व शिस्तभंगाची कारवाई यांसारखे नियम असतानाही प्रत्यक्षात त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामीण व दुर्गम शाळांकडे गांभीर्याने लक्ष देणे, नियमित तपासण्या वाढवणे, शाळा व्यवस्थापन समितींना अधिक अधिकार देणे आणि दोषी शिक्षकांवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दुर्गम भागातील शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन उपाययोजना करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा शिक्षकांच्या अपडाऊन वेळेच्या खेळखंडोब्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती नाकारता येणार नाही.

चांदूर बाजार सार्वजनिक बांधकाम विभागाला नवे नेतृत्व

निलेश चौधरी यांनी उपकार्यकारी अभियंता पदाचा पदभार स्वीकारला

उपकार्यकारी अभियंता मिलिंद भेंडे यांच्या सेवा निवृत्तीनंतर चांदूरबाजार कार्यालयाचा कारभार हा अचलपूर येथील अधिकाराकडे प्रभारी देण्यात आला होता.मात्र प्रभारी कारभार असतांना अनेक महत्त्वाच्या तालुक्याच्या बाबीकडे लक्ष दिले जात नसल्याने आता कायमस्वरूपी अधिकारी मिळाल्याने कामाच्या गुणवत्ता आणि गती बद्दल वेग वाढणार असल्याचे दिसत आहे.

महासागर प्रतिनिधी
चांदुर बाजार, (दि. 3) - चांदूर बाजार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंता पदी निलेश चौधरी यांनी 9 फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. अनुभवी आणि कामकाजात तत्पर अधिकारी म्हणून ओळख असलेल्या चौधरी यांच्या नियुक्तीमुळे चांदूर बाजार तालुक्यातील रखडलेली विकासकामे वेग घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी चांदूर बाजार तालुक्यात कार्यरत असताना निलेश चौधरी यांनी विविध विकासकामांवर विशेष भर दिला होता. रस्ते, पूल, सार्वजनिक इमारती तसेच दुरुस्ती व देखभाल कामांच्या माध्यमातून त्यांनी तालुक्याच्या पायाभूत सुविधांना चालना दिली होती. त्याचप्रमाणे चिखलदारा येथे उपकार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असताना अनेक प्रलंबित कामे मार्गी लावून त्यांनी प्रशासनातील कार्यक्षमता अधोरेखित केली होती.

कामातील शिस्त, वेळेत निर्णय घेण्याची क्षमता आणि गुणवत्तेला प्राधान्य देणारी भूमिका ही त्यांची ओळख आहे. त्यामुळेच पुन्हा एकदा चांदूर बाजार तालुक्याची जबाबदारी त्यांच्या हाती आल्याने तालुक्याच्या विकासाला झपाट्याने गती मिळेल, असा विश्वास स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींमधून व्यक्त होत आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना चौधरी यांनी, तालुक्यातील नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, रखडलेली कामे तातडीने पूर्ण करणे आणि नव्या विकासकामांचे योग्य नियोजन करणे, यावर भर दिला जाईल,असे स्पष्ट केले.

दरम्यान, त्यांच्या नियुक्तीबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच तालुक्यातील विविध स्तरांतून अभिनंदन व्यक्त करण्यात येत असून, चांदूर बाजार तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी ही नियुक्ती महत्त्वाची ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

'व्हेअर इ यु लिव्ह?' विचारताच विद्यार्थिनी पडली बुचकळ्यात

आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी उपस्थित केला शिक्षणाच्या दर्जावर प्रश्न

महासागर प्रतिनिधी
अंजनगाव सुर्जी,(दि. 3) - एकीकडे शासन शिक्षकांच्या पगारावर आणि शैक्षणिक सुविधांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करीत असताना, दुसरीकडे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याची प्रचीती एका साध्या इंग्रजी प्रश्नावरून आली.

महाराष्ट्राचे माजी शिक्षण सचिव तसेच आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी मंगळवारी (दि. 3 फेब्रुवारी 2026) अंजनगाव नगरपालिकेस भेट दिली. यावेळी नगराध्यक्ष अविनाश गायगोले, मुख्याधिकारी लोहोकरे व इतर नगरपरिषद सदस्य उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

यानंतर आमदार अभ्यंकर यांनी नगरपरिषद माध्यमिक विद्यालयास भेट दिली. नव्या वर्गातील एका विद्यार्थिनीला त्यांनी इंग्रजीत अतिशय सोपा प्रश्न विचारला "Where do you live? (तुम्ही कुठे राहता?). मात्र हा साधा प्रश्नही विद्यार्थिनीला समजला नाही व उत्तर देता आले नाही. ही बाब पाहून आमदार अभ्यंकर यांना धक्काच बसला.

या घटनेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची वास्तविक स्थिती समोर आली आहे. शासन स्तरावर मोठा खर्च होत असतानाही विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि भाषिक प्रगतीकडे संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या प्रगतीवर नियमित लक्ष ठेवणे हे शिक्षण विभाग, गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे; मात्र प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र दिसत आहे. यामुळेच सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणी असूनही आपल्या पाल्यांना खाजगी शाळांत का दाखल करतात, याचे उत्तर या घटनेतून मिळते. नगरपरिषद शाळांतील शिक्षणाचा दर्जा किती खालावला आहे, याची प्रचिती या प्रकारातून आली आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारी शिक्षण व्यवस्था सक्षम नसेल, तर राष्ट्राच्या प्रगतीसमोरील अडथळे वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, शिक्षण सभापती व नगरसेवकांसमोर शालेय शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

शाळेतून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडला पाहिजे - क्षितिज अभ्यंकर

शाहू महाराज विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन, हळदी-कुंकू व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

महासागर प्रतिनिधी
नांदगाव खंडेश्वर, (दि. 3)- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबतच सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. शाळेतून सर्वगुणसंपन्न, सजग व जबाबदार नागरिक घडले पाहिजेत, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष क्षितिज मधुकरराव अभ्यंकर यांनी केले. राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावतीद्वारे संचालित सालोड कसबा येथील शाहू महाराज विद्यालय, श्री वसंतदादा पाटील कनिष्ठ महाविद्यालय तसेच लक्ष्मीबाई अभ्यंकर प्री-प्रायमरी स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन, हळदी-कुंकू समारोह व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शुभांगी अभ्यंकर उपस्थित होत्या. त्यांनी महिलांमधील सुप्त गुणांना अशा कार्यक्रमांतून वाव मिळतो व स्त्री ही कुटुंबाचा कणा असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हळदी-कुंकू समारोहाच्या निमित्ताने उपस्थित महिलांचा सन्मान करून तिळगुळ व वाण वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. क्रीडा स्पर्धांमध्ये प्रथम आलेल्या तसेच सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अविनाश पवार यांनी केले. सूत्रसंचालन वैशाली राहाटे यांनी तर आभार प्रदर्शन अनिल गवई यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

मनपा शाळांतील विद्यार्थ्यांच्या नेत्र आरोग्यासाठी ठोस पाऊल

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 3)- अमरावती महानगरपालिकेने मनपा शाळांतील विद्यार्थ्यांच्या नेत्र आरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला आहे. या उपक्रमाचा आढावा महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच घेण्यात आला. दिशा आय फाउंडेशनच्या सहकार्याने मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांची सखोल नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीत 318 विद्यार्थ्यांना दृष्टीदोष आढळून आल्याने त्यांना मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. तसेच 462 विद्यार्थ्यांमध्ये गंभीर नेत्रविकार निदर्शनास आल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, डीइआयसी, पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व आचार्य विनोबा भावे रुग्णालय येथे तज्ज्ञ उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत इतर आरोग्य तपासण्यांचाही आढावा घेण्यात आला. वेळेत तपासणी व उपचारांमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासह शैक्षणिक प्रगतीला चालना मिळत असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

जिल्ह्यात 'कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र' अभियानाचा शुभारंभ

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि.3)- कुष्ठरोग हा शाप नसून पूर्णत: उपचारसाध्य आजार आहे, हा संदेश समाजात रुजवण्यासाठी जिल्ह्यात 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती व 'कुसुम' कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी (ता. अमरावती) येथे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कुष्ठरोग निर्मूलनाची सामूहिक शपथ घेतली.

याप्रसंगी महापात्र यांनी अंजनगाव बारी परिसरातील वीटभट्ट्यांवर जाऊन कामगारांशी संवाद साधत तपासणी केली व कुष्ठरोगाची लक्षणे ओळखण्याबाबत समुपदेशन केले. कुष्ठरुग्णांविषयीची अंधश्रद्धा दूर करून त्यांना सन्मानाने वागणूक मिळावी, हा 'स्पर्श' अभियानाचा उद्देश आहे. 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारीदरम्यान जिल्हाभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. शासकीय रुग्णालयांत बहुविध औषधोपचार मोफत उपलब्ध असून वेळेवर उपचार घेतल्यास शारीरिक विकृती टाळता येते. कार्यक्रमास आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अचलपुरच्या सुपुत्राचा राष्ट्रपती पोलीस पदकाने होणार सत्कार

कर्तबगार अधिकारी
एसडीपीओ पराग पोटे

महासागर प्रतिनिधी
अचलपूर, (दि. 3) - काटोल उपविभागीय पोलीस अधिकारी पराग बापूराव पोटे यांना भारत सरकारतर्फे राष्ट्रपती पोलीस पदक देऊन सत्कार केला जाणार आहे. अचलपूर शहरातील बारीपुरा भागातून पोलीस सेवेत प्रवेश केलेले पोटे यांचे कर्तृत्व, धैर्य आणि प्रामाणिकपणा यावर हा सर्वोच्च सन्मान दिला जात आहे.

सन 1995 मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर पोटे यांनी गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात चार वर्षे नक्षलविरोधी मोहीमेत सहभाग घेतला. बंदुकीच्या सावलीत काम करत त्यांनी पोलिसी शौर्य सिद्ध केले. याशिवाय वर्धा, यवतमाळ, बुलडाणा आणि नागपूर जिल्ह्यांत कार्यरत असताना त्यांनी अनेक गंभीर प्रलंबित गुन्ह्यांची उकल केली व गुन्हेगारी टोळ्यांना कायद्याच्या चौकटीत आणले. नागपूर शहरातील जरीपटका-लकडगंज ट्राफिक विभागात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी वाहतूक नियंत्रणाबरोबरच कायद्याचा कटाक्षही ठेवल्याने पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाले. सध्या काटोल उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले पोटे शिस्तप्रिय, निर्भीड आणि तडजोड न करणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. स्थानिक सामाजिक, राजकीय वर्तुळात त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

439 कोटींच्या थकीत वीजबिलासाठी महावितरणचा कडक इशारा

12 फेब्रुवारीला 16,981 शासकीय कार्यालयांचा 24 तास वीजपुरवठा खंडित

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि. 3)- परिमंडळातील शासकीय कार्यालयांकडील तब्बल 439 कोटी रुपयांच्या थकीत वीजबिलांच्या वसुलीसाठी महावितरणने कठोर पावले उचलली आहेत. वारंवार सूचना, स्मरणपत्रे, प्रत्यक्ष पाठपुरावा, नोंदणीकृत मोबाईलवर संदेश तसेच 22 जानेवारी रोजी चार तासांचे 'टोकन डिस्कनेक्शन' करूनही प्रतिसाद न देणाऱ्या 16,981 शासकीय कार्यालयांचा वीजपुरवठा येत्या 12 फेब्रुवारी रोजी 24 तासांसाठी खंडित करण्यात येणार आहे. वीजबिल भरणे ही केवळ आर्थिक बाब नसून, वीजबिल वसुली हाच महावितरणचा प्रमुख आर्थिक स्रोत आहे. या कारवाईनंतरही थकीत रकमेचा भरणा न करणाऱ्या शासकीय कार्यालयांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केला जाईल, असा स्पष्ट इशारा मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला असून, तातडीने थकीत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

अमरावती-यवतमाळ परिमंडळातील स्थिती

परिमंडळातील 16,981 थकबाकीदार शासकीय कार्यालयांपैकीअमरावती जिल्ह्यातील 8,191 कार्यालयांकडे 132 कोटी 28 लाख, तर यवतमाळ जिल्ह्यातील 8,790 कार्यालयांकडे 306 कोटी 52 लाख रुपये वीजबिल थकीत आहे.

शासकीय थकबाकीचा कर्मचाऱ्यांवर परिणाम

शासकीय कार्यालयांकडील वाढती थकबाकी ही महावितरणसाठी मोठी अडचण ठरत असून, वसुलीबाबत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत आहे. थकीत बिलांबाबत कर्मचाऱ्यांना वारंवार विचारणा केली जात असून, वसुलीसाठी त्यांनाच जबाबदार धरले जात असल्याची स्थिती आहे.

5,427 कार्यालयांनी एकदाही बिल भरले नाही

एप्रिल 2025 नंतर 5,427 शासकीय व सार्वजनिक सेवा कार्यालयांनी एकदाही वीजबिल न भरल्याने त्यांच्याकडे 111 कोटी 52 लाख रुपयांची थकबाकी जमा झाली आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील 1,896 कार्यालयांकडे 56 कोटी 32 लाख, तर यवतमाळ जिल्ह्यातील 3,531 कार्यालयांकडे 55 कोटी 20 लाख रुपयांची थकबाकी आहे. महावितरणने या पार्श्वभूमीवर थकीत वीजबिलांचा तातडीने भरणा करण्याचे आवाहन पुन्हा एकदा शासकीय कार्यालयांना केले आहे.

जगदंबा पब्लिक स्कूल येथे तीन दिवसीय स्नेहसंमेलन उत्साहात

महासागर प्रतिनिधी
चांदूर बाजार, (दि. 3) अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातील जगदंबा पब्लिक स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे हे स्नेहसंमेलन सलग तीन दिवस विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडात्मक उपक्रमांनी रंगले.

स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. शैक्षणिक, क्रीडा तसेच इतर स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभात गौरव करण्यात आला. मागील वर्षी इयत्ता चौथीत शिकणारी विद्यार्थिनी स्वरां प्रदीप निचत हिने वर्गात द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केल्याबद्दल तिला ट्रॉफी देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेली पारंपरिक व आधुनिक नृत्ये, नाट्यछटा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता पाचवीतील कु.स्वरा प्रदीप निचत व सहकारी विद्यार्थिनींनी मराठमोळ्या गाण्यावर सादर केलेल्या समूह नृत्याला विशेष दाद मिळाली. या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले.

स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष विनोद कोरडे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील सहभागही तितकाच आवश्यक असल्याचे नमूद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या तीन दिवसीय स्नेहसंमेलनामुळे शाळेच्या उपक्रमांना नवी ऊर्जा मिळाली. कार्यक्रमास पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

निरामय

गुडघेदुखीवर नेमका उपाय काय?

गुडघेदुखीचा त्रास असेल, तर ती संधिवात किंवा ऑस्टियोआर्थ्रायटिस असू शकते. या आजारासाठी औषधे सहसा दीर्घकाळ काम करत नाहीत, म्हणून गुडघेदुखी असलेल्या रुग्णांना गुडघा बदलण्याची शिफारस करतात; पण प्रत्येक रुग्णाला गुडघा बदलण्याची आवश्यकता आहे का? इंजेक्शन किंवा कार्टिलेज बदलणे देखील काम करू शकते का? प्रत्येक रुग्णाची स्थिती वेगळी असते. गुडघेदुखी असलेल्या रुग्णांकडे औषधांपासून संपूर्ण गुडघा बदलण्यापर्यंतचे पर्याय आहेत. रोबोटिक शस्त्रक्रिया आता उपलब्ध आहे. त्यामुळे गुडघा बदलण्याची प्रक्रिया काही प्रमाणात करता येते. गुडघ्याच्या दुखापतीचे मुख्य कारण ऑस्टियोआर्थ्रायटिस आहे. तो एक प्रकारचा संधिवात आहे. शिवाय, वयानुसार कूर्चांची झीज, जास्त वजनामुळे सांध्यावर जास्त दबाव, जुन्या दुखापती किंवा फ्रॅक्चर आणि कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीची कमतरता या सर्वांमुळे गुडघ्याचे नुकसान होऊ शकते. हे गुडघ्याच्या हाडांमधील कूर्चाच्या झीज आणि फाटण्यामुळे होते. समस्या लवकर आढळली आणि रुग्णाने सौम्य वेदना होताच डॉक्टरांचा सल्ला घेतला तर फिजिओथेरपी, गुडघे मजबूत करण्याचे व्यायाम आणि कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स सारखी औषधे रोग वाढण्यापासून रोखू शकतात. तथापि, वेदना दुर्लक्षित केल्या गेल्या तर समस्या आणखी वाढते. अशा परिस्थितीत, इंजेक्शनपासून शस्त्रक्रियेपर्यंत इतर उपचार पद्धतींचा विचार करावा लागतो.

आरोग्यमंत्र

गुडघ्याचे इंजेक्शन कधी काम करू शकतात?

गुडघ्याच्या सांध्यातील वंगण कमी होते, तेव्हा हायलुरोनिक ॲसिड इंजेक्शन दिले जातात. हे इंजेक्शन हाडांमधील घर्षण कमी करते आणि वेदना आणि कडकपणापासून आराम देते. तथापि, इंजेक्शन फक्त कुर्च्या पूर्णपणे झिजलेल्या नाहीत अशा रुग्णांसाठी योग्य आहेत. एका इंजेक्शनचा परिणाम ४ ते ६ महिने टिकतो. त्यानंतर, दुसरे इंजेक्शन दिले जाऊ शकते. कुर्च्या जीर्ण झाल्या नसतील तर इंजेक्शन आणि निरोगी जीवनशैलीच्या मदतीने शस्त्रक्रिया टाळता येते. म्हणून, प्रथम कूर्च्या तपासा.

कुर्च्या बदलणे फायदेशीर आहे का?

संपूर्ण कुर्च्या बदलणे शक्य नाही. दुरुस्ती किंवा कलम करणे आवश्यक आहे. तथापि, ते ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये प्रभावी नाही. ही उपचारपद्धती फक्त तरुण रुग्णांमध्ये आणि मर्यादित नुकसान असलेल्या रुग्णांमध्ये प्रभावी आहे. गुडघ्याच्या एका मोठ्या भागाला दुखापत झाली असेल, तर कार्टिलेज उपचार अप्रभावी ठरतात. म्हणूनच, लोकांना हे समजून घेणे महत्वाचे आहे, की कार्टिलेज रिप्लेसमेंट हे गुडघेदुखीने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी नेहमीच शक्य नसते.

गुडघा रिप्लेसमेंटची आवश्यकता कधी असते?

एखादा रुग्ण औषधे काम मरत नसल्याची किंवा इंजेक्शन्स आराम देत नसल्याची तक्रार करतो तेव्हा डॉक्टर गुडघा रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेची शिफारस करतात. कार्टिलेजची स्थितीदेखील तपासली जाते. ती पूर्णपणे जीर्ण झाली असेल, तर शस्त्रक्रिया आवश्यक आहे. गुडघा रिप्लेसमेंट सुरक्षित आहे. ते अनेक वर्षे टिकते आणि शस्त्रक्रियादेखील कमी वेळात केली जाते. शस्त्रक्रियेच्या त्याच दिवशी रुग्णाला रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जातो.

दूषित पाण्यामुळे गंभीर आजार

भारतात दरवर्षी पाणी संकट लाखो लोकांच्या जीवनावर परिणाम करते. शहरे आणि गावांमधील अनेक लोक स्वच्छ पाणी पिऊ शकत नाहीत आणि त्यांना दूषित पाणी पिण्यास भाग पाडले जाते. हे दूषित पाणी अनेक आजारांचे मुख्य कारण आहे. दूषित पाणी पिण्यामुळे पोट, यकृत, मूत्रपिंड आणि त्वचेचे आजार होतात. प्रसंगी ते मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकते.

भारतात अनेक ठिकाणी लोकांना अजूनही स्वच्छ पाणी मिळत नाही. ही केवळ गावांमधलीच समस्या आहे, असे नाही. शहरे आणि महानगरांमध्येही दूषित पाण्यामुळे लोक आजारी पडत आहेत. घाणेरडे पाणी तुम्हाला फक्त अस्वस्थ करत नाही, तर त्यामुळे गंभीर आजारदेखील होऊ शकतात. त्यात असलेले बॅक्टेरिया, विषाणू आणि विषारी पदार्थ आपल्या शरीरात प्रवेश करतात आणि विविध समस्या निर्माण करतात.

* पोटाच्या समस्याः उलट्या, अतिसार, पोटदुखी, कॉलरा आणि टायफॉइड सारखे गंभीर आजार.
* यकृताचे आजारः हिपॅटायटीस ए आणि ई (कावीळ) सारख्या समस्या.
* मूत्रपिंडाच्या समस्याः घाणेरड्या पाण्यात असलेले आर्सेनिक, शिसे आणि कॅडमियम सारखे जड धातू हळूहळू मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतात.
* त्वचेच्या समस्याः पुरळ, ॲलर्जी, सोरायसिस आणि एक्झिमा सारख्या समस्या.
* कर्करोग आणि इतर गंभीर आजारः दूषित पाण्यात असलेले कर्करोगजन्य घटक आणि विषारी पदार्थ दीर्घकालीन कर्करोगासारखे घातक आजार निर्माण करू शकतात.
* न्यूरोलॉजिकल समस्याः स्मरणशक्ती कमी होणे, मूड स्विंग आणि इतर मानसिक समस्यादेखील उद्भवू शकतात.

घाणेरडे पाणी पिण्यामुळे देशात दरवर्षी किती लोक आजारी पडतात?

भारतात घाणेरड्या पाण्याची समस्या मोठी आहे. जुलै २०२२ च्या अभ्यासानुसार, भारतातील अंदाजे १९५,००० वस्त्यांमधील लोक दूषित पाणी पित आहेत.

व्याधी विकार

यामुळे केवळ सामान्य आजारच पसरत नाहीत, तर २०१९ मध्ये अंदाजे २.३ दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला. 'कम्पोझिट वॉटर मॅनेजमेंट इंडेक्स' (सीडबल्यूएमआय) अहवालानुसार भारतात दरवर्षी अंदाजे दोन लाख लोक दूषित पाणी पिण्यामुळे मरतात. या समस्येवर त्वरित उपाय केला नाही तर २०३० पर्यंत अंदाजे सहा लाख लोकांना पाण्याची टंचाई आणि दूषित पाण्याचा सामना करावा लागू शकतो.

गलिच्छ पाणी सर्वात जास्त कुठे आहे?

शहरी झोपडपट्ट्या आणि गर्दीच्या भागात घाणेरडे पाणी सर्वाधिक प्रमाणात आढळते. लहान क्षेत्रे, वसाहती आणि अपार्टमेंटमध्ये घाणेरडे पाणी पुरवठ्यामुळे दरमहा शेकडो लोक रुग्णालयात जातात.

तज्ज्ञांचा इशारा

दूषित पाणी पिण्यामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावरही परिणाम होतो. वेळेवर उपचार न मिळाल्यास, मूत्रपिंड आणि यकृतामध्ये गंभीर संसर्ग पसरू शकतात.

घरगुती खबरदारी आणि उपचार

*पिण्याचे पाणीः नेहमी उकळलेले किंवा फिल्टर केलेले पाणी प्या.
* इलेक्ट्रोलाइट्सः डिहायड्रेशन टाळण्यासाठी लिंबू पाणी, नारळ पाणी आणि ओआरएस वापरा.
* हलके अन्नः उलट्या किंवा जुलाब झाल्यास, दलिया, दही-भात आणि केळीसारखे हलके अन्न खा.
* सावध राहाः सतत जुलाब, उलट्या, जास्त ताप, लघवी कमी होणे किंवा शरीर/डोळे पिवळे होत असतील तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.
*स्वच्छताः ताजे आणि झाकलेले अन्न खा, हात चांगले धुवा आणि वेळेवर लसीकरण करा.

तिळाकडे दुर्लक्ष नको

आजकाल लोक त्वचेबद्दल खूप गंभीर आहेत. अचानक शरीरावर तीळ येतो तेव्हा पहिला प्रश्न पडतो, की हा तीळ का दिसतो आणि तो कोणत्या आजाराचे लक्षण आहे का? खरं तर, तीळ हा त्वचेवर एक लहानसा डाग असला, तरी तो केवळ त्वचेचा पोत बदलत नाही, तर कधीकधी आरोग्याशी संबंधित बरीच माहितीदेखील देऊ शकतो. तीळ अचानक दिसतात, रंग बदलतात किंवा आकार वाढतो, तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. त्वचेमध्ये असलेल्या मेलॅनिन रंगद्रव्यामुळे तीळ तयार होतात. त्वचेच्या वरच्या थरातील मेलॅनोसाइट्स नावाच्या पेशी एकाच ठिकाणी जमतात आणि अधिक रंगद्रव्य तयार करू लागतात, तेव्हा तीळ तयार होतात. हे तीळ तपकिरी, काळे, हलके गुलाबी किंवा कधीकधी निळेदेखील असू शकतात. काही तीळ जन्मापासूनच असतात, तर काही बालपणात हळूहळू दिसतात. प्रौढ व्यक्तीच्या शरीरावर १० ते ४० तीळ असणे सामान्य मानले जाते. वयानुसार हे तीळ थोडे बदलू शकतात. कालांतराने अनेक तीळ अधिक स्पष्ट होतात. त्यांचा रंग फिकट होऊ शकतो किंवा ते स्वतःच नाहीसे होऊ शकतात.

शरीरावर तीळ का तयार होतात?

शरीरावर तीळ तयार होण्यामागे अनेक कारणे असतात. कुटुंबातील एखाद्या सदस्याला अनेक तीळ असतील, तर पुढच्या पिढीलाही ही समस्या येऊ शकते. किशोरावस्था, गर्भधारणेदरम्यान किंवा हार्मोनल बदलांमध्ये नवीन तीळ दिसू शकतात. या काळात तीळांचा रंगदेखील बदलू शकतो. सूर्यप्रकाशातील अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे

कधीकधी मेलॅनिनचे उत्पादन वाढते. त्यामुळे शरीराच्या थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येणाऱ्या भागांवर तीळ अधिक दिसतात. याव्यतिरिक्त वयानुसार त्वचेतील बदलांमुळे तीळ तयार होऊ शकतात.

तीळ धोकादायक असू शकतात का?

बहुतेक तीळ निरुपद्रवी असतात आणि त्यांना काढण्याची आवश्यकता नसते. तथापि, तीळ अचानक बदलला, आकारात जलद वाढ, रंगात बदल, असमान कडा, खाज सुटणे, वेदना किंवा दुखापत न होता रक्तस्राव होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशी लक्षणे त्वचेच्या कर्करोगाशी संबंधित असू शकतात.

कॉर्टिसॉल वाढणे धोकादायक

कामाचा वाढलेला ताण, आर्थिक चिंता, कौटुंबिक जबाबदाऱ्या, झोपेचा अभाव या सगळ्यामुळे शरीरात एक हार्मोन वाढते. त्याला कॉर्टिसॉल म्हणतात. हे हार्मोन आवश्यक असलं, तरी सतत वाढलेलं कॉर्टिसॉल हृदयासाठी मात्र घातक ठरते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

ताणाचे व्यवस्थापन करणे आणि हृदयाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. उच्च कोलेस्ट्रॉलप्रमाणेच, दीर्घकालीन ताण तुमच्या हृदयाला नुकसान पोहोचवू शकतो. देशभरात सर्वच वयोगटांतील लोकांमध्ये हृदयाच्या समस्या मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. अनेक वर्षांपासून हृदयाच्या समस्यांच्या बाबतीत उच्च कोलस्टेरॉलला मुख्य गुन्हेगार मानले जाते. सध्या व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनातील तणाव, आर्थिक चिंता आणि वाढलेला स्क्रीन टाईममुळे तणावाचे प्रमाण वाढत आहे. या ताणामुळे कॉर्टिसॉलची पातळी वाढते. कॉर्टिसोलची पातळी वाढते तेव्हा ते हृदय आणि रक्तवाहिन्यांना नुकसान पोहोचवू शकते.

आरोग्य मंथन

कॉर्टिसॉल हृदयाच्या आरोग्यावर कसा परिणाम करते?

तणावाच्या वेळी आपले शरीर कॉर्टिसॉल सोडते. सतत ताण येत राहतो, तेव्हा अनेक समस्या सुरू होतात. कॉर्टिसॉलची उच्च पातळी रक्तदाब वाढवते. रक्तातील साखर वाढवते आणि पोटाभोवती चरबी साठण्यास प्रोत्साहन देते. कालांतराने यामुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे तुम्हाला हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. दीर्घकालीन ताणामुळे शरीरात सूज (इन्फ्लेमेशन) येते. ही सूज रक्तवाहिन्यांना नुकसान पोहोचवते आणि प्लाक जमा होण्यास मदत करते. त्यामुळे हृदयविकाराचा झटका तसेच पक्षाघाताचा धोका वाढतो. उच्च कॉर्टिसॉलमुळे झोपेत व्यत्यय येतो. शारीरिक हालचाल कमी होऊ शकते. खाण्याच्या चुकीच्या सवयी लागू शकतात आणि हृदयाला याचा त्रास होऊ शकतो. ताणामुळे धूम्रपान, कॅफीनचे वाढते सेवन, चुकीचा आहार आणि व्यायामाचा अभाव यांसारख्या वाईट सवयीदेखील लागू शकतात. या सर्व गोष्टींमुळे हृदय विकाराचा धोका वाढतो. अनेक लोकांमध्ये कोलेस्टेरॉलची पातळी सामान्य असूनही, अनियंत्रित ताणामुळे त्यांना हृदयाच्या समस्या उद्भवू शकतात. तणावमुक्त राहणे आणि हृदयाचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

कॉर्टिसॉलची पातळी कमी करण्यासाठी आणि हृदयाचे संरक्षण करण्यासाठी या महत्त्वाच्या टिप्स फॉलो करा.
*योग, ध्यान किंवा दीर्घ श्वासोच्छ्वास यांसारख्या विश्रांती तंत्रांचा अवलंब करून तणावाचे व्यवस्थापन करा.
*दररोज किमान ८ तास शांत झोप घ्या.
*धूम्रपान आणि मद्यपान टाळा, कॅफीनचे सेवन मर्यादित करा.
*ताजी फळे, भाज्या, तृणधान्य, कडधान्ये आणि सुका मेवा व तेलबियांचा समावेश असलेला पौष्टिक आहार घ्या.
*जंक फूड, मसालेदार, तेलकट, हवाबंद डब्यातील आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन टाळा. *स्क्रीन टाईम कमी करा आणि कामातून ठराविक वेळाने विश्रांती घ्या.
*रोजनिशी लिहिणे तणाव कमी करण्यास मदत करू शकते.
* जास्त तणावामुळे चिंता, पॅनिक अटॅक किंवा नैराश्य येत असेल, तर तज्ज्ञांची मदत घ्या. *सक्रिय जीवनशैली बाळगा.

साखर मेंदूवरही करते परिणाम

मधुमेहाच्या बाबतीत साखरेची अनेकदा चर्चा केली जाते; परंतु सत्य त्यापेक्षा खूप खोल आहे. जास्त साखरेचा केवळ रक्तातील साखरेवरच परिणाम होत नाही, तर हळूहळू हृदय, यकृत, मेंदू आणि मानसिक आरोग्याचे नुकसान होते. त्याची सर्वात मोठी समस्या अशी आहे, की त्याचे परिणाम लगेच दिसून येत नाहीत, तर कालांतराने शांतपणे वाढतात.

व्याधी विचार

साखर ही मधुमेहाचे एकमेव कारण नाही; परंतु ती एक प्रमुख जोखीम घटक आहे. साखरेची पेये आणि प्रक्रिया केलेले अन्न रक्तातील साखर आणि इन्सुलिन प्रतिरोधकता वेगाने वाढवतात. दीर्घकाळ अनियंत्रित ठेवले तर ते डोळे, मूत्रपिंड, नसा आणि हृदयाला नुकसान पोहोचवू शकते. साखर थेट कर्करोगास कारणीभूत ठरत नाही; परंतु जास्त साखरेचा आहार शरीरात लठ्ठपणा आणि जळजळ वाढवतो. हे दोन्ही घटक कर्करोगाचा धोका वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. संशोधनात असे दिसून आले, आहे की जे जास्त साखरेचे सेवन करतात, त्यांना कर्करोगाचा धोका लक्षणीयरीत्या जास्त असतो.

साखरेचे जास्त सेवन केल्याने वाईट कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्स वाढतात, तर चांगले कोलेस्टेरॉल कमी होते. यामुळे धमन्यांमध्ये चरबी जमा होते आणि हृदयरोगाचा धोका वाढतो. यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक होऊ शकतो. साखरेचा काही भाग यकृतामध्ये चरबीमध्ये रूपांतरित होतो. साखरेचे सेवन जास्त असेल तर यकृतामध्ये चरबी जमा होऊ लागते. त्याला फॅटी लिव्हर म्हणतात. वेळेवर लक्ष दिले नाही तर यामुळे जळजळ आणि यकृताचे नुकसान होऊ शकते. साखरयुक्त पदार्थ कॅलरीजने समृद्ध असतात; परंतु जास्त काळ पोट भरत नाहीत. यामुळे वारंवार भूक लागते आणि जास्त खाणे होते. हळूहळू वजन वाढते. त्यामुळे चयापचय आरोग्य बिघडते. जास्त साखरेचा मेंदूवरही परिणाम होतो. रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढल्याने मूड स्विंग, चिडचिडेपणा आणि नैराश्य येऊ शकते. अभ्यासात असे आढळून आले आहे, की जे लोक जास्त साखरेचे सेवन करतात, त्यांना नैराश्याचा धोका जास्त असतो. जास्त साखरेचे सेवन मेंदूमध्ये जळजळ आणि इन्सुलिन प्रतिरोध वाढवू शकते. याचा स्मरणशक्ती आणि शिकण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. दीर्घकालीन, या स्थितीमुळे विस्मरणासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो.

जास्त साखरेमुळे रक्तातील साखर आणि रक्तदाब दोन्ही वाढतात. त्यामुळे मूत्रपिंडांवर अतिरिक्त ताण येतो. कालांतराने, मूत्रपिंडाचे कार्य कमकुवत होते. मधुमेह आणि उच्च रक्तदाब असलेल्या लोकांमध्ये हा धोका विशेषतः जास्त असतो.

बॅक्टेरिया ठरू शकतो वरदान!

प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या विषाणूंचा बिमोड हे आरोग्यक्षेत्रापुढचं मोठं आव्हान आहे. त्यांना रोखण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांमध्ये प्रकाशाचा एक किरण दिसला आहे. उत्तर आयर्लंडच्या भूमीत आढळलेले बॅक्टेरिया अशा विषाणूंचा सामना करू शकतात, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इथली माती खूपच गुणकारी असल्याचं बोललं जातं. प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या चार प्रकारच्या विषाणूंविरोधात हा बॅक्टेरिया प्रभावी ठरला आहे. त्यामुळे येत्या काळात अशा घातक विषाणूंना थोपवून धरता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

रात्री दात का घासावे?

दिवसातून दोन वेळा दात घासण्याचा सल्ला दिला जातो. पण बरेच जण रात्री झोपण्याआधी दात घासत नाहीत. अर्थातच ही मोठी चूक आहे. रात्री दात घासणं अत्यंत गरजेचं आहे. दात न घासता झोपल्याने त्यावर प्लाकचा थर साचतो आणि दात कठोर बनतात. या थरामुळे तोंडाला दुर्गंधी येणं, हिरड्यांमधून रक्त येणं, जंतूसंसर्ग, हिरड्यांची सूज यांसारख्या समस्या निर्माण होतात. तोंडात सातत्याने आम्ल तयार होत असतं. रात्री दात घासल्याने आम्लाच्या निर्मितीला प्रतिबंध घातला जातो. बॅक्टेरियांची वाढ थांबते. तोंडात अन्नकण रहात नसल्यामुळे कुजण्याचा धोका रहात नाही आणि दात चांगले राहतात.

डोळे कोणत्या रंगाचे?

गडद रंगाचे डोळे असणाऱ्यांना हिवाळ्यातले नेत्रविकार जडण्याची शक्यता अधिक असते. निळ्या किंवा फिकट रंगाचे डोळे असणाऱ्यांमध्ये नेत्रविकारांचं प्रमाण कमी असल्याचं आढळून आलं आहे. हे अनुमान काढण्यासाठी १७५ विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात आला. फिकट डोळ्यांमध्ये प्रकाश कमी प्रमाणात शोषला जात असल्याचं तज्ज्ञ सांगतात.

केस गळत आहेत?

प्रदूषण, ताण, विविध रसायनांचा वापर यामुळेही केस गळण्याची समस्या निर्माण होते. पोषक घटकांचा अभावही केसगळतीला कारणीभूत ठरतो. हे थांबवण्यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असावा. दूध, दही, अंडी, मटार, सुका मेवा यांचं सेवन करता येईल. अंड्यातला पिवळा भाग, रताळी, ॲव्होकॅडो, यीस्ट, दुग्धजन्य पदार्थांमधून बियोटिन हा घटक मिळतो जो उपकारक ठरतो. यासोबतच मेडिटेशन आणि योगाचाही चांगला परिणाम दिसून येतो.

किती काळ वापरायच्या वस्तू?

घरात बऱ्याच वस्तू साठवून ठेवलेल्या असतात. अशी बराच काळ जपलेली उशा, पांघरूणं वर्षानुवर्षं वापरणं आरोग्याला घातक ठरु शकतं. म्हणूनच नव्या वर्षात अशा जुन्या आणि आरोग्याला हानिकारक सामानाला बाहेरचा रस्ता दाखवा. * आकार बदललेल्या, रंग उडालेल्या, कापूस बाहेर आलेल्या उशा काढून टाका. उशांवर सर्वात जास्त धूळ साठत असते. त्यांच्यावर अनेक घातक जंतूंचा वास असतो. त्यामुळे साधारणत: दर दोन वर्षांनी उशा, पांघरूणं बदलायला हवी. * सजावटीच्या हेतूने सुगंधी मेणबत्त्या वापरल्या जातात. त्या जळत असताना घरात सुगंध दरवळतो. प्रसन्न वाटतं. पण उघड्यावर पडलेल्या मेणबत्त्यांवर भरपूर धूळ साठते. तसंच या धुरात घातक रसायनं असू शकतात. हा धूर श्वासावाटे शरीरात जाणं घातक ठरू शकतं. * डबाबंद किंवा प्रक्रिया केलेल्या पदार्थांचा कालावधी संपत आल्यास टाकून द्या. ताजे आणि आरोग्यदायी पदार्थ खा. * कालावधी उलटून गेलेली औषधं घरात ठेऊ नका. त्यांचं सेवन खूप घातक ठरू शकतं. कालावधी पूर्णपणे न उलटलेल्या औषधांचा प्रभाव कमी झालेला असतो. तसंच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही औषधं घेऊ नये. * टॉवेल, पंचे, नॅपकिन्स जास्त काळ वापरू नये. त्यात भरपूर बॅक्टेरिया असतात. नियमित धुण्यामुळेही बॅक्टेरिया कमी होत नाहीत.



त्यामुळे वापर सुरू केल्यापासून साधारण वर्षभराने ते टाकून द्यायला हवे. ओटा स्वच्छ करायचे स्पंज तसंच लाकडी आणि प्लास्टिक चॉपिंग बोर्डही काही काळाने बदलून टाका.

संतुलित जीवनशैलीसाठी

लाईफस्टाईल

पोषक आहार, पुरेसा व्यायाम आणि सोबतीला समाधान अशी आदर्श जीवनशैली राखणं ही तारेवरची कसरत ठरते. एकतर आपण डाएटचा अतिरेक करतो किंवा त्याकडे पूर्ण दुर्लक्ष तरी करतो. पण हे दोन्ही प्रकार टाळून सुवर्णमध्य गाठणं गरजेचं असतं. तन आणि मन दोघांनाही लाभदायी ठरणारी जीवनशैली कशी जपायची? जाणून घेऊ या.

* भूक लागलेली असताना खाणं आणि उगाचच भावनेच्या भरात चरत राहणं यात फरक करता यायला हवा. अन्न ग्रहण करतेवेळी संपूर्ण लक्ष खाण्यावर केंद्रित करा. यावेळी स्मार्टफोन वापरू नका. टीव्ही बघू नका.
* आपण नियमित व्यायामाचं महत्त्व जाणतो. शारीरिक कसरतीमुळे शरीरासोबतच मेंदूही निरोगी राहतो. त्यामुळे व्यायामाची निश्चित वेळ ठरवा आणि मुख्य म्हणजे ती पाळा.
* वजन कमी करण्याच्या नादात जेवण टाळू नका. यामुळे शरीराला पोषक घटक मिळत नाहीत. उगीच उपासमार होते. इतकंच नाही तर यामुळे अतिखाणं होतं.
* जेवताना शीतपेय किंवा फळांच्या रसाऐवजी पाणी प्या.

गरीब शेतकऱ्यांसाठी लवकरच कर्जमाफी

मंत्री बावनकुळेंच्या वक्तव्याने नव्या चर्चेला उधाण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या मराठवाडा भागातील एका प्रचार सभेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडली. गरीब शेतकऱ्यांची सरकारकडून कर्जमाफी केली जाणार असून, सरकारने दिलेला शब्द निश्चितपणे पाळला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वर्षानुवर्षे शेतात राबणाऱ्या आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला जाईल, फार्महाऊसधारक किंवा धनदांडग्या शेतकऱ्यांचा विचार न करता खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांनाच या निर्णयाचा लाभ मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे यांनी कर्जाच्या वाढत्या व्याजदरांवर भाष्य करताना सांगितले की, कर्जावर व्याज आणि त्यावर पुन्हा व्याज वाढत जात असल्यामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जातात आणि आत्महत्येचा विचार करतात. अशा परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही, असा दिलासाही त्यांनी दिला. गरीब शेतकरी ४०-४० वर्षे शेतात राबतात, कर्जबाजारी होतात आणि शेवटी हताश होतात; पण आम्ही त्यांना आत्महत्येपर्यंत जाऊ देणार नाही, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

या वक्तव्यामुळे महायुती सरकारकडून लवकरच कर्जमाफीसंदर्भात मोठा निर्णय जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यभरातील शेतकरी आता या निर्णयाच्या अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत. मात्र, बावनकुळे यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे ही कर्जमाफी फक्त गरीब शेतकऱ्यांसाठीच असेल. त्यामुळे गरीब शेतकरी, या निकषात नेमके कोण बसतील, कोणत्या शेतकऱ्यांना वगळले जाईल, आणि गरिबी ठरवण्याचे मापदंड काय असतील, हे प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

बावनकुळे यांनी पुढे सांगितले की, सरकारचा प्रयत्न केवळ कर्जमाफीपुरता मर्यादित नसून भविष्यात शेतकऱ्यांना कर्ज घ्यावेच लागू नये, असा व्यापक विचार केला जात आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या आणि स्थिरतेच्या दृष्टीने धोरणात्मक पावले उचलण्याचा सरकारचा मानस असल्याचे त्यांनी संकेत दिले. यामुळे कर्जमाफी ही तात्पुरती मदत असली तरी दीर्घकालीन उपाययोजनांवरही सरकार काम करत असल्याचे चित्र समोर आले.

सभेदरम्यान बावनकुळे यांनी महिलांसाठीच्या योजनांचाही उल्लेख केला. काँग्रेसचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये लाडकी बहीण योजना बंद करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. त्याउलट, भाजपशासित राज्यांमध्ये ही योजना सुरू असून महाराष्ट्रातही नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ती सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. या वक्तव्यामुळे राजकीय वातावरणातही चर्चा रंगली.

यासोबतच त्यांनी केंद्र सरकारच्या लखपती दीदी योजनेचा उल्लेख करत, महिलांना विनातारण आणि विनाहमी पाच लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज मिळणार असल्याची माहिती दिली. या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक बळ मिळेल आणि स्वावलंबनाच्या दिशेने त्यांची वाटचाल होईल, असे त्यांनी सांगितले. शेतकरी आणि महिला सक्षमीकरण या दोन्ही मुद्द्यांना एकत्रितपणे हाताळण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

धाराशिवमधील येणेगुर येथे जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने आयोजित सभेत झालेल्या या विधानांमुळे राज्याच्या राजकारणात आणि शेतकरी वर्गात उत्सुकता वाढली आहे.

कर्जमाफीच्या आश्वासनासोबतच महिलांसाठीच्या योजनांचा उल्लेख केल्याने या सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. आता राज्य सरकार कर्जमाफीबाबत अधिकृत निर्णय कधी जाहीर करते आणि त्याचे निकष काय असतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दादांच्या अस्थी वैनगंगेत विसर्जित

■ **महासागर प्रतिनिधी**
भंडारा, दि. ३ :

माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे आज भंडारा शहरात आगमन झाले. जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात हजारो नागरिक, कार्यकर्ते आणि सर्वपक्षीय नेत्यांनी अंतिम दर्शन घेतले.

आज सकाळी ११:०० वाजता बारामतीहून आणलेला अस्थिकलश दर्शनासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्यालयात ठेवण्यात आला होता. यावेळी गुरुदेव सेवा मंडळ, गणेशपूर यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या भजनांनी वातावरण भावूक झाले. शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती.

याप्रसंगी आयोजित शोकसभेत उपस्थितांनी दादांच्या कार्याचा गौरव केला. भंडारा जिल्ह्याच्या सिंचन प्रश्नावर दादांनी दिलेले योगदान अविस्मरणीय असल्याचे मान्यवरांनी सांगितले. याप्रसंगी नाना पंचबुद्धे, आमदार राजू कारेमोरे, आमदार नरेंद्र भोंडेकर, माजी खासदार मधुकर कुकडे, माजी आमदार चरण वाघमारे, नगराध्यक्षा सौ. मधुरा मदनकर यांच्यासह धनंजय दलाल, सुनील फुंडे आणि जिल्ह्यातील अनेक नेत्यांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

दुपारी ३ वाजता जिल्हा कार्यालयातून अस्थिकलशाची अंतिम यात्रा निघाली. ही यात्रा महाल मार्ग, गांधी चौक, पोस्ट ऑफिस चौक मार्गे वैनगंगा नदीच्या जुन्या पुलाजवळील घाटावर पोहोचली. तिथे विधिवत पूजा-अर्चा करून अत्यंत भावूक वातावरणात अस्थींचे विसर्जन करण्यात आले. 'अजितदादा अमर रहे'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

गुजराती उद्योगपतीच्या मध्यस्थीने

राष्ट्रवादीचे विलीनीकरण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासाठी एक उद्योगपती समेट घडवून आणत आहेत. त्यांनी अट इतकीच घातली आहे की यांनी एनडीएला पाठिंबा द्यावा यावर एकमत होणं बाकी आहे. यासाठी गुजरात आणि देशाचे एक मोठे उद्योगपती यांनी मध्यस्थी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे याची माहिती माज्याकडे आहे, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

हे विलीनीकरण झाल्यानंतर पुढे एनडीएबरोबरच या मंडळींनी रहावे अशा अटी आणि शर्ती घातल्या आहेत. त्या मान्य असतील तर विलीनीकरण होईल असे मला वाटते.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, चंद्रपूर मनपामधील आमच्या ६ नगरसेवकांचे प्रमाणपत्र गहाळ झाले आहेत त्यासाठी आम्ही तक्रार सुद्धा दिली असून नवीन प्रमाणपत्र घेतले. गट नोंदणी करत असताना आयुक्तांना प्रमाणपत्र देण्याची काही गरज नाही. पण आयुक्त मात्र सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालच्या मांजर झाल्यासारखे वागत आहेत. त्यांनी या प्रक्रियेमध्ये गट स्थापन करण्यासाठी नोंदणी करण्याची गरज असते. आयुक्तांवर कोणाचा तरी दबाव असून आमच्या नगरसेवकांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा कट आयुक्त रचत आहेत.

वडेट्टीवार म्हणाले की, आम्ही कायदेशीर लढाई लढणार आहोतच. पण सत्तास्थापनेसाठी भाजपने त्यांच्यावर पूर्ण दबाव टाकला आहे. त्यांनी ठरवले आहे की रोज आमच्या गटाला फिरवणार पण गट स्थापप होऊ देणार नाही. आयुक्तांना नोंदणी करण्याचा अधिकार आहे त्यांना काही समस्या असेल तर विभागीय आयुक्तांनी तसे सांगावे नाही तर गट नोंदणी करूण घ्यावी. त्यांनी मला हे सर्व लेखी दिल्याशिवाय मी तिथून उठणार नाही. त्यांनी संपूर्ण प्रक्रिया लटकत ठेवली आहे. आम्हाला कोर्टात जाण्यापासून अडवण्याचे काम करत स्वतःही आयुक्त मॅडम निर्णय घेत नाही असा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, नगरसेवकांच्या गट नोंदणीसाठी नगरविकास खात्याचा काहीही संबंध येत नाही हेच आम्ही त्यांना सांगतो आहोत. त्यांना केवळ नाकारण्याचा आणि स्वीकारण्याचा अधिकार आहे, त्यांनी जर नाकारले तर आम्ही कोर्टात जाऊ. परंतू विभागीय आयुक्तांकडे १ महिना हे सर्व पडून राहील आणि विरोधी पक्ष आपले काम करेल हे षंड्यत्र विभागीय आयुक्तांकडून रचले जात आहे.

अजित पवारांच्या विमान अपघाताची

स्वतंत्र चौकशी व्हावी

सीआयडी काय चौकशी करते हे मला माहिती... अनिल देशमुख

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. ३ :

सीआयडी काय चौकशी करते हे मला माहित आहे. मी गृहमंत्री होतो. हायकोर्ट जजच्या नियंत्रणाखाली चौकशी झाली तरच सत्य बाहेर येऊ शकते. संजय राऊत यांनी देखील हायकोर्टच्या चौकशीची मागणी केली आहे. त्यांना माझा पूर्ण पाठिंबा आहे, असे शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. त्यांनी अजित पवार गटाच्या कार्यालयात त्यांना श्रद्धांजली वाहिली आणि या अपघाताच्या नवी चौकशीची मागणी केली आहे.

अनिल देशमुख यांनी व्हिजिबिलिटीवर आधारीत कारणांकडे संशय व्यक्त केला. अनिल देशमुख म्हणाले की, व्हिडीओ पाहून दिसते की अपघाताचे कारण फक्त कमी दृश्यता नाही. केंद्रीय मंत्रालयाने व्हिजिबिलिटीचे कारण सांगितले, पण त्यावर विश्वास बसत नाही. त्यामुळे व्यवस्थित चौकशी होणे गरजेचे आहे. अनेक नेत्यांकडून शंका उपस्थित केल्या जात आहेत, त्यामुळे खाजगी विमानामध्ये प्रवास करताना काळजी घेणे गरजेचे आहे. त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना देखील याबाबत सूचना देण्याचा विचार असल्याचे सांगितले.

ही चर्चेची वेळी नाही

दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येण्यासंदर्भातही अनिल देशमुख म्हणाले की, सध्या या विषयावर चर्चा करण्याची वेळ नाही. योग्य वेळ आली की त्या बाबत बोलणार आहे. कुठे कुठल्या मिटिंग झाल्या, कोण उपस्थित होते, हे सर्व मी सांगणार.

सध्या अपघाताच्या चौकशीसाठी सीआयडी आणि डिजीसीआय कार्यरत आहेत, पण हायकोर्टच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र चौकशी केल्यास अपघाताचे खरे कारण समोर येईल, असा विश्वास नेत्यांनी व्यक्त केला आहे. यापूर्वी ममता बॅनर्जी, खा .संजय राऊत, आ . विजय वडेट्टीवार, आ . अमोल मिटकरी यांनीही अपघाताच्या चौकशीची मागणी केली आहे.

सायबर ठगाकडून सव्वा कोटींचा गंडा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**

आयुष्यभर बँकेत प्रामाणिक सेवा देऊन निवृत्तीनंतर शांत जीवन जगत असलेल्या ज्येष्ठ नागरिकाला सायबर ठगांनी अक्षरशः हादरवून सोडले. गणेशपेठ परिसरात राहणाऱ्या गेडाम या निवृत्त बँक कर्मचाऱ्याला डिजिटल अटकची भीती दाखवत सायबर ठगांनी सव्वा कोटी रुपयांचा गंडा घातला.

गणेशपेठ परिसरात राहणारे गेडाम यांना आधी व्हॉट्स अपवरून एक फोन आला. फोन करणाऱ्याने आपण सक्तवसुली संचालनायातून (ईडी) बोलत असल्याचे सांगत मानवी तस्करी गुन्ह्यात आपल्या खात्यात आर्थिक व्यवहार झाल्याची भिती दाखवली. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत गेडाम यांना सीबीआयचे अधिकारी भासवणाऱ्याने अटकेचे वॉरंट निघाल्याची भिती दाखवली.

सध्या डिजिटली अटक होत आहे, प्रत्यक्षात अटक टाळाळची तर पैसे द्या अशी भिती गेडाम यांना दाखवण्यात आली. गेडाम यांच्याकडून खात्याचा गुप्त क्रमांक मिळवत सायबर ठगांनी १० वेळा वेगवेगळ्या खात्यांवर १ कोटी १३ लाख रुपये वळती केले. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे. पोलिसांनी १५ लाख रुपये गोठवले आहेत. राजस्थान आणि हरियाणातून हा व्यवहार झाल्याचे पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासातून समोर आले आहे.

टाकाऊ प्लास्टिक बाटल्यांमधून

टिकाऊ कलाकुसर

लोकमानस

एरवी लग्नकार्यात किंवा प्रवासात वापरात येणारी प्लास्टिक बाटली, थंडपेयांच्या रिकाम्या झालेल्या बाटल्या, धुण्याच्या पावडरची पिशवी.. हा तसा पर्यावरणासाठी चिंतेचा विषय. यामुळे होणारे प्रदूषण अनेकांची डोकेदुखी ठरली, तर काहींसाठी नवनिर्मितीचा ध्यास.

मंगला धोंगडे यांनी वापरा आणि फेकून द्या या तत्त्वावर वापरल्या गेलेल्या रिक्त प्लास्टिक बाटल्यांपासून आकर्षक सजावटीच्या वस्तू, महिलांचे आभूषणे, विज्ञान प्रदर्शनात वापरली जाणाऱ्या विविध प्रतिकृती तयार केल्या आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विविध प्रकल्प तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. आगामी काळात ही कला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. दिडोरी रस्त्यावर राहणाऱ्या मंगला विजय धोंगडे यांना सुरुवातीपासून विविध कलाकुसरीच्या वस्तू तयार करण्याची आवड आहे. त्यांच्या या आवडीला २०१० मध्ये भरलेल्या बाल महोत्सवाने वेगळा आयाम दिला.

टाकाऊतून टिकाऊ, पण काही तरी हटके या संकल्पनेवर त्यांना महोत्सवातील प्रदर्शनात एक गाळा देण्यात आला. भरतकाम, रुखवतातील काही सामान तयार करण्याचे कसब सलेल्या धोंगडे यांनी हटके म्हणजे नेमके काय, यावर लक्ष केंद्रित केले. समोर दिसलेली रिकामी प्लास्टिकची बाटली हाती घेऊन त्यांनी यापासून काही वेगळे तयार करता येईल याचा विचार सुरू केला.

सुरुवातीला हातातील बाटली अर्धी कापून त्याचे पेन स्टॅण्ड तयार केले. त्याला सजावट म्हणून स्पार्कलचा वापर केला. उरलेल्या बाटलीला त्यांनी फुलाचा आकार दिला. त्यांच्या अखंड प्रयत्नांतून ३२ हून अधिक प्रकारची विविध आकर्षक रंगसंगतीतील फुले, वेगवेगळ्या आकारातील पान, राख्या, तोरण, महिलांची आभूषणे त्यांनी तयार केली.

आभूषणांमध्ये नेकलेस, बिंदी, बांगडी, कानातले, बाजूबंद आदींचा समावेश आहे. याशिवाय डायनिंग सेट, लहान-मोठ्या आकारातील फुलांच्या परड्या, गुढी, फेकून दिलेल्या सिडीवर आकर्षक वॉलपीस अशा असंख्य वस्तू त्यांनी कल्पकतेने निर्मिल्या आहेत.

या अनोख्या वस्तू निर्मितीच्या प्रवासात त्यांचे पती डॉ. विजय धोंगडे, मुलगी गीतांजली यांचे सहकार्य लाभल्याचे धोंगडे यांनी सांगितले. रिकामी बॉटल, फेव्हिकॉल, सर्जिकल कात्री आणि स्पार्कल कलर, प्लास्टिकच्या रिकाम्या पिशव्या, कुंदन, लेस अशा काही सजावटीच्या सामानातून आपण कसलीही प्रतिकृती सहज करू शकतो हा आत्मविश्वास त्यांना आहे.

कलेचा वारसा त्यांच्या मुलीनेही जपला असून ही कला अधिकाधिक लोकांपर्यंत जावी यासाठी शहर परिसरातील शाळा, आश्रमशाळांमध्ये त्यांचे प्रशिक्षण वर्ग सुरू असतात. नजीकच्या काळात मतिमंद, गतिमंद तसेच गरजू मुलांसोबत काम करत त्यांना पोटापाण्याचा व्यवसाय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुसरीकडे, पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी बागेतील कचऱ्यांपासून पांडुरंगचूल तयार केली आहे. त्याचा सध्या अभ्यास सुरू आहे. तसेच शाळांसाठी एका अभिनव प्रयोगाची आखणी धोंगडे करत आहेत.

■ ■ ■

असा लागला शोध

सेफ्टीपिन

खरंतर सेफ्टी पिन ही खूप छोटी गोष्ट आहे, पण ही छोटी गोष्ट तुमच्या कपड्यांसाठी खूप महत्त्वाची आहे. विशेषतः महिलांसाठी सेफ्टी पिन खूप गरजेची आहे. स्त्रिया जेव्हा साडी नेसतात तेव्हा हमखासपणे सेफ्टी पिनचाच वापर केला जातो. फार पूर्वीच्या काळात पुरुष देखील कॉलरसाठी सेफ्टी पिनचा वापर करायचे.

पण, तुमच्या घरात रोज वापरात येणाऱ्या या वस्तूचा तुम्ही कधी विचार केला आहे का? सेफ्टी पिनचा शोध कोणी लावला? त्याचं नाव कसं पडलं? १८४९ मध्ये, एक अमेरिकन माणूस अनेक लोकांच्या कर्जात बुडाला होता. त्याची परतफेड करण्यासाठी तो दररोज नवीन शोध लावत असे. या अमेरिकन माणसाचे नाव होते 'वॉल्टर हंट' . वॉल्टर हंट यांनी १८४९ मध्ये सेफ्टी पिनचा शोध लावला आणि नंतर त्याचे पुन्हा पेटंट घेतले. पेटंट केल्यानंतर, जेव्हा त्यांनी ते विकले तेव्हा त्यांना ४०० डॉलर मिळाले.

सेफ्टी पिनचा शोध का लागला या संबंधित अनेक प्रकारच्या कथा आहेत. मात्र, ज्यची सर्वाधिक चर्चा आहे ती वॉल्टर हंटच्या पत्नीशी संबंधित आहे. ती कथा म्हणजे, एके दिवशी हंटची पत्नी काही कामानिमित्त बाजारात जात होती आणि त्या दरम्यान तिच्या ड्रेसचे बटण तुटले.

यानंतर वॉल्टर हंटला काही समजले नाही तेव्हा त्याने वायरच्या तुकड्यापासून पिनसारखी वस्तू बनवली आणि बटणाच्या जागी लावली. अशा प्रकारे वॉल्टर हंटच्या मनात पहिल्यांदा सेफ्टी पिनचा विचार आला. वॉल्टर हंटने याचा शोध लावला, तोपर्यंत लोक याला 'ड्रेस पिन' म्हणायचे. सुरुवातीला सेफ्टी पिनचे स्वरूप आज दिसते तसे नव्हते, नंतर ते वॉल्टर हंटने अशा प्रकारे बनवले की ते लावताना हाताला दुखापत होणार नाही. तसेच, कपडे देखील चांगले सेट आणि सेफ राहतील. यावरून नंतर 'ड्रेस पिन' हे 'सेफ्टी पिन' म्हणून ओळखले जाऊ लागले.

■ ■ ■

जानेवारीमध्ये सुझुकी मोटरसायकलची

१,२५,७८६ युनिट्सची विक्री

सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी असलेल्या सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. लि. ने जानेवारी २०२६ मधील आपल्या विक्री कामगिरीची घोषणा केली.

SMIPL ने जानेवारी २०२६ मध्ये एकूण १,२५,७८६ युनिट्सची विक्री नोंदवली, जी जानेवारी २०२५ मध्ये विकल्या गेलेल्या १,०८,९२१ युनिट्सच्या तुलनेत १५% वाढ दर्शवते. कंपनीने देशांतर्गत १,००,२९६ युनिट्सची विक्री नोंदवली, जी जानेवारी २०२५ मधील ८७,८३४ युनिट्सच्या तुलनेत १४% वाढ आहे. निर्यातीत २१% वाढ झाली असून, जानेवारी २०२६ मध्ये २५,४९० युनिट्सची निर्यात झाली, तर गेल्या वर्षी याच महिन्यात २१,०८७ युनिट्सची निर्यात झाली होती.

याव्यतिरिक्त, SMIPLच्या सुटे भागांच्या विक्रीतून जानेवारी २०२६ मध्ये ८९५.६ दशलक्ष रुपयांचा महसूल मिळाला, ज्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत २०% वाढ नोंदवली गेली. जानेवारी २०२६ हा SMIPL साठी एक महत्त्वाचा महिना ठरला, कारण कंपनीने एकूण उत्पादनात १० दशलक्ष युनिट्सचा टप्पा ओलांडला, ज्यामुळे भारतीय बाजारपेठेप्रती तिची दीर्घकालीन वचनबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

बनावट जन्म-मृत्यू नोंदीची एसआयटीकडून चौकशी

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ , दि. ३ :**

बनावट जन्म-मृत्यू नोंदीच्या तपासाच्या दृष्टीने विशेष तपास पथकाने (एसआयटी) गेले दोन दिवस जिल्ह्यात कसून चौकशी केली. आर्णी तालुक्यातील शेंदुरसनी या दीड हजार लोकसंख्येच्या गावात या बनावट नोंदी आढळल्यानंतर खळबळ उडाली होती.

या गावात विशेष तपास पथकाने धडक देत चौकशी केली. यावेळी पथकाने उपस्थित गटविकास अधिकारी, ग्रामसेवकांकडून प्रकरणाची सखोल माहिती घेतली. यासोबत रजिस्ट्रर तसेच इतरही बाबींची पाहणी केली. आर्णी तालुक्यातील शेंदुरसनी ग्रामपंचायतीत नोंद झालेल्या २७ हजार ३९७ जन्म आणि ११ मृत्यू नोंदीचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला. या प्रकरणी देशभरातील विविध ठिकाणाहून आतापर्यंत अनेक आरोपींना अटक करण्यात आली आहे.

हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष तपास पथक गठीत केले. या पथकाचे अध्यक्ष तथा सायबर सेलचे अपर पोलीस महासंचालक यशस्वी यादव, आरोग्य उपसंचालक बबिता कमलापूरकर यांनी शनिवारी यवतमाळ गाठले. पोलिसांनी केलेल्या तपासाच्या दृष्टीने माहिती घेण्यात आली.

चार मजली इमारतीवर चालवला बुलडोझर

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ३ :**

गडचिरोली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आणि काँग्रेसचे नेते अजय कंकडालवार यांच्या अहेरी येथील चार मजली व्यावसायिक इमारतीवर नगरपंचायत प्रशासनाने आज बुलडोझर चालवला. राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या या इमारतीसाठी कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचा ठपका ठेवत, न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.

अजय कंकडालवार यांनी अहेरी येथे राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला एक चार मजली व्यावसायिक इमारत उभारली होती. मात्र, या बांधकामासाठी नगरपंचायतीची कोणतीही तांत्रिक किंवा प्रशासकीय परवानगी घेण्यात आली नव्हती. या बेकायदेशीर बांधकामाबाबत नगरपंचायतीने कंकडालवार यांना वारंवार नोटिसा बजावल्या होत्या. प्रशासनाच्या या भूमिकेविरोधात कंकडालवार यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते.

या प्रकरणाची सुनावणी अहेरी न्यायालयात पार पडली. न्यायालयाने दोनवेळा संबंधित बेकायदेशीर इमारत पाडण्याचे आदेश दिले होते. दरम्यान, या निर्णयाला अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने स्थगिती दिली होती आणि कंकडालवार यांना उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी मुभा दिली होती. मात्र, दिलेल्या मुदतीत त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली नाही. अखेर, अहेरी न्यायालयाचा मूळ निर्णय कायम राहिल्याने नगरपंचायत प्रशासनाने आज प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली.

राजकीय सूडबुद्धीने कारवाई?

अजय कंकडालवार यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदही भूषवले आहे. ऐन जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या धामधुमीत झालेली ही कारवाई राजकीय हेतूने प्रेरित असल्याची चर्चा अहेरीमध्ये रंगली आहे. मात्र, नगरपंचायत प्रशासनाने ही कारवाई पूर्णपणे कायदेशीर प्रक्रियेचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाकडे सरकारचा कानाडोळा

■ **महासागर प्रतिनिधी**
बुलढाणा, दि. ३ :

जी रामजी (पूर्वीची मनरेगा) अंतर्गत मागील अनेक वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मुंबई येथील आझाद मैदानात ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. २ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या या आंदोलनात ३४ जिल्ह्यातील हजारो कर्मचारी सहभागी झाले आहेत. मात्र दुसऱ्या दिवशीही हे आंदोलन सरकार लेखी उपेक्षितच ठरल्याने कर्मचाऱ्यात संतप्त प्रतिक्रिया उमटली आहे.

२ फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांनी मुंबई येथील आझाद मैदानात ठिय्या मांडला आहे. सध्या राज्यातील २२०० कंत्राटी कर्मचारी यात सहभागी झाले आहे. यामध्ये एमआयएस समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहायक कार्यक्रम अधिकारी, पॅनल तांत्रिक अधिकारी, क्लार्क कम डेटा ऑपरेटर, वाहन चालक यांचा समावेश आहे. मनरेगा अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्याप्रमाणे शासन सेवेत कायम वा समायोजित करावे, एस-२ इन्फॉटेक मार्फत होणारी अनधिकृत व अवैध कर्मचारी भरती बंद करावी, कर्मचाऱ्यांची निवड राज्य निधी असोशियसन मार्फतच करावी, इतर योजनाप्रमाणे मनरेगाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनिहाय आकृतिबंध तयार करण्यात यावा आदी मागण्यासाठी राज्यातील कमी अधिक ४३०० कर्मचाऱ्यांनी एल्गार पुकारला आहे.

दरम्यान या आंदोलनामुळे घरकुल, सिंचन विहीर, वृक्ष लागवड, फळबाग, पाणंद रस्ते आदि कामे ठप्प झाली आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यात दररोज सरासरी ६ ते ७ लाख मजूर कामावर राहतात. आज ही संख्या जेमतेम ९४ हजारावर आल्याचा दावा संघटनेच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्याने केला आहे. १ फेब्रुवारीला हाच आकडा १ लाखाच्या आसपास होता.

राज्यातील सर्वच पंचायत समितीमध्ये नरेगा कक्षाला टाळे दिसत असून गावपातळीवरील रोजगार हमीची कामे ठप्प झाली आहेत. मुंबईतील आंदोलनात लवकर तोडगा न निघाल्यास राज्यातील सर्व कामे बंद पडणार हे उघड आहे.